अहवाल क्रमांक : १६९

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**परभणी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# तेविसावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक १ मार्च, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई**
**२०१९**

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**परभणी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक अहवालाच्या संदर्भातील**

# तेविसावा अहवाल

# पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

(१) *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. अनिल गोटे, वि.स.स.
(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(६) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
(७) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
(८) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(९) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(१०) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
(१४) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
(१५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(१६) श्री. अमित झनक, वि.स.स.
(१७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१८) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(१९) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२०) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२१) श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
(२२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(२४) **रिक्त
(२५) **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(३) श्री. अनिल गोटे, वि.स.स.

(४) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(५) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

(८) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(९) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(१०) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(११) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(१२) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१३) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१४) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(१५) ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

(१६) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(१७) श्री. अमित झनक, वि.स.स.

(१८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१९) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

(२४) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

(२५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा तेविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि, शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच

मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठीदेखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उप केंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठित झालेल्या समितीने परभणी जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने परभणी जिल्हा परिषदेस दिनांक ८, ९ व १० नोव्हेंबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री. प्रताप सवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठित झालेल्या समितीने परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, परभणी संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. र. प्र. आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. ला. रा. गुजर, सहसचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. म. सा. ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती शुभांगी शेठ, सहसचिव, वित्त विभाग, श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. बाळासाहेब

रासकर, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री. सु. ल. टोपले, उप सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. चंद्रकांत मोटे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती इंद्रा मालो, आयुक्त, आयसीडीएस, महिला व बालकल्याण विभाग तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या परभणी जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| १. | एक | २२ बळीराम नांगराची चोरी झाल्याबाबत (पंचायत समिती, परभणी) | १ |
| २. | दोन | पंचायत समिती उपकराची रक्कम खर्च न केल्याबाबत (पंचायत समिती, मानवत) | ४ |
| ३. | तीन | खोरस आरोग्य उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत | ६ |
| ४. | चार | रोजगार हमी योजनेतील मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यात जमा करण्यात आल्याबाबत (पंचायत समिती, सेलू) | १३ |
| ५. | पाच | जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या ५६ नळ पाणीपुरवठा योजनांबाबत | १५ |
| ६. | सहा | शाळा खोल्या व वस्तीशाळा बांधकामाच्या सद्यःस्थितीबाबत | १९ |
| ७. | सात | परभणी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी संदर्भात | २१ |
| ८. | आठ | पंचायत समितीचे अंदाजपत्रकात समाजकल्याण व महिला व बालकल्याणासाठी विहित तरतूद न ठेवणेबाबत (पंचायत समिती, जिंतूर) | २६ |
| ९. | नऊ | जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांबाबत | २८ |
| | | **परिशिष्ट** **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | ३१ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## २२ बळीराम नांगराची चोरी झाल्याबाबत (पंचायत समिती, परभणी)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीच्या कृषी गोदामात दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ रोजी शिल्लक असलेले एकूण २२ बळीराम नांगर व उर्वरित सुट्टया भागांची चोरी झाली, याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, सन २०१२-२०१३ मधील वस्तुंच्या साठ्याची दिनांक ५ जून, २०१३ रोजी पडताळणी करण्यात आली. दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ रोजी चोरी झाली. १९८ पैकी १७६ नांगरांचे वाटप करण्यात आले होते. पुढे कृषी अधिकारी यांनी समितीस माहिती विशद केली की, सर्व २२ नांगर चोरीला गेलेले नाहीत. सुटे भाग म्हणजे फाळ चोरीला गेले आहेत. नांगर स्टॉकला आहेत. परंतु, फाळ नसल्यामुळे शेतकऱ्यांना नांगर देता येणार नाही.

समितीने निदेश दिले की, सर्व १९८ नांगरांचे वितरण का करण्यात आले नाही, अधिकचे नांगर घेण्यात आले होते का, याबाबतची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी व समितीला अहवाल सादर करावा. कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार करण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. त्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असतो. या सर्व योजना गट विकास अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांना राबवावयाच्या आहेत. पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन सर्वसामान्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न आपल्याकडून झाला पाहिजे. यादृष्टीने भविष्यात सर्व अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, परभणी येथील २२ बळीराम नांगर चोरीला गेल्या प्रकरणी व १९८ नांगरांचे वितरण न करण्यात आल्याप्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०११-१२ मध्ये केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत (NOOP) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांनी शासन नियुक्त पुरवठा संस्था महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, नांदेड यांचेकडे दिनांक २४ मार्च, २०१२ रोजी नोंदविलेल्या आदेशानुसार पुरवठा संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी पंचायत समिती, परभणी स्तरावर एकूण १९८ बळीराम नांगरांचा पुरवठा केला होता. पुरवठा केलेल्या एकूण १९८ बळीराम नांगरापैकी लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांचे मागणीनुसार १७६ नांगराचे वाटप करण्यात आले व उर्वरित २२ बळीराम नांगराचे फाळ व सुटे भाग पंचायत समितीच्या गोदामातून दिनांक ४ ऑक्टोबर, २०१३ रोजी चोरीस गेले.

त्यामुळे तत्कालीन गोदामपाल यांनी याप्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाणे (स्टेशन), परभणी येथे त्याच दिवशी (गुन्हा नोंदणी क्रमांक २५७/२०१३ दिनांक ४ ऑक्टोबर, २०१३ रोजी) गुन्हा दाखल केला आहे. सद्यःस्थितीत सदर प्रकरण मा. न्यायालय, परभणी (जे.एम.एफ.सी.कोर्ट) येथे न्यायप्रविष्ट असून न्यायालयीन प्रकरण क्रमांक आर.सी.सी.६४५/१४ असल्याबाबत कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी कळविले आहे.

कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी कळविल्यानुसार पंचायती राज समितीच्या निर्देशाप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती परभणी यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली असून चौकशी अंती प्रथमदर्शनी कोणीही दोषी आढळून आले नाही. तथापि सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषी व पदुम (कृषी) विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, परभणी यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, पंचायत समिती परभणी येथील २२ बळीराम नांगर चोरीला गेल्या प्रकरणी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१३ रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीनुसार

सदर प्रकरणाची स्थिती काय आहे व यासंदर्भात कोणती प्रशासकीय कार्यवाही केलेली आहे, यावर कृषी विभागाचे उप सचिव यांनी समितीस माहिती विशद केली की, सन २०११-२०१२ मध्ये केंद्र पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम राबविण्यात आला होता. या योजनेमध्ये ६० टक्के केंद्र शासनाचा हिस्सा आणि ४० टक्के राज्य शासनाचा हिस्सा दिला जातो. यावर समितीने केवळ नांगर चोरीला गेल्यासंदर्भातील उत्तर द्यावे असे सांगितले असता. कृषी विभागाचे उपसचिव यांनी समितीस माहिती विशद केली की, यामध्ये बळीराम नांगर हे अवजार केंद्र शासन पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम योजनेंतर्गत खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती.

समितीने पुढे विचारणा केली की, ती सर्व माहिती लेखी स्वरूपात प्राप्त आहे. नांगर चोरी प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली, यावर कृषी विभागाच्या उप सचिवांनी खुलासा केला की, बळीराम नांगर चोरी प्रकरणी पोलीस केस करण्यात आलेली आहे. तसेच त्याबाबत माननीय न्यायालयात प्रकरण दाखल झाले असून दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी सुनावणी होणार आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, बळीराम नांगर चोरी प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर पोलीस केस करण्यात आली. आता यामध्ये ५ वर्षात किती तारखा झालेल्या आहेत, तसेच जिल्हा परिषदेचे वकील कोणत्या तारखेला हजर राहिलेले आहेत, जिल्हा परिषदेच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की तारीख असेल त्यावेळी जिल्हा परिषदेतर्फे वकील हजर राहिलेले आहेत. परंतु यामध्ये प्रत्येक वेळेला तारीख मिळत गेलेली आहे. तसेच या प्रकरणासंदर्भात सन २०१३ मध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे व सन २०१४ मध्ये दोषारोप पत्र दाखल केलेले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, गोदामात ठेवण्यात आलेले सर्व २२ नांगर चोरीला गेलेले आहेत. गोदामपाल, रखवालदार असताना याबाबत जबाबदारी निश्चित करून तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षित होते. २२ नांगरांची रक्कम जास्त मोठी नसेल. परंतु चोरी करण्याची प्रवृत्ती घातक आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने या प्रकरणासाठी नियुक्त केलेले वकील तारखेवर हजरच रहात नाहीत. याचा अर्थ कर्मचाऱ्याला संरक्षण देण्याचा हा प्रकार आहे. जिल्हा परिषदेच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, या प्रकरणात कृषी विभागाच्या उप सचिवांनी सांगितल्याप्रमाणे यासंदर्भात सन २०१३ मध्ये गुन्हा दाखल झाला होता व सन २०१४ मध्ये आरोपपत्र दाखल झाले होते. त्यानंतर सरकारी वकील (गव्हर्नमेंट प्लीडरची) सुनावणी वेळी हजर होते. प्रत्येक तारखेचे सुनावणी आहे. जिल्हा परिषदेकडे अभिलेखे उपलब्ध आहेत. असे नाही की, जिल्हा परिषदेकडून आवश्यक तो पाठपुरावा न केल्यामुळे विलंब झाला. नियमित तारखा झालेल्या आहेत. सरकारी वकील हजर देखील झाले होते. आता मा. न्यायालयाने पुढील तारीख दिलेली आहे.

समितीने विचारणा केली की, हे प्रकरण मा. न्यायालयात गेले तोपर्यंत ठीक आहे. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून, प्रथमदर्शनी प्रशासकीय कार्यवाही होणे अपेक्षित होती व ती झालेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणात चौकशीअंती कोणीही दोषी नाही. बळीराम नांगर चोरी झाले ते साहित्य गोडावूनमध्ये होते व तेथून रात्री चोरीला गेलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, गोडावूनमधील साहित्याची चोरी होऊ नये म्हणून तेथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असते. चोरी केव्हा झाली,त्यासंदर्भात एफआयआर केव्हा दाखल केला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती विशद केली की, बळीराम नांगराची चोरी झाल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१३ रोजी माहिती मिळाली. त्याच दिवशी गुन्हा दाखल केलेला आहे. एफआयआर नंबर २५७/२०१३ हा आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, गोदामाजवळ गोदामपाल, रखवालदार असतात. चोरी झाली त्या दिवशी गोदामाजवळ कोणीच नव्हते काय, त्यांचे जबाब नोंदवून घेतलेले आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती विशद केली की, चोरांनी गोदामाच्या भिंतीला मोठे भगदाड पाडून चोरी केली होती. तेथे रखवालदार नव्हता. जिल्हा परिषदेकडे रखवालदाराचे पद नाही. यावर समितीने निदेश दिले की, एफआयआरची प्रत वाचून दाखवावी. समितीला वाटते यांनी अज्ञात चोरांवर गुन्हा नोंदवून विषय संपविलेला आहे. अशी समितीने नाराजी व्यक्त केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती विशद केली की, वरील तारखेला आरोपींनी पंचायत समितीच्या पुर्वेकडील भिंतीला भगदाड पाडून आत प्रवेश करून गोडावूनमधील विद्यूत पंप, बैलनांगर व नांगराचे सुट्टे भाग अज्ञात चोरट्याने चोरून नेले म्हणून गुन्हा दाखल असे एफआयआरमध्ये दिलेले आहे. तसेच साहित्यांची किंमत टाकलेली आहे. बैल नांगरांची किंमत ११ हजार ८८० रूपये निश्चित केलेली आहे. एका नांगरांची किंमत १ हजार ८० रूपये आहे. असे एकूण २२ नांगर होते.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता, सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०११-१२ मध्ये केंद्र पुरस्कृत गळीत धान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नांदेड यांचेकडे नोंदविलेल्या आदेशानुसार पुरवठा संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी पंचायत समिती परभणी स्तरावर एकूण १९८ बळीराम नांगरांचा पुरवठा करण्यात आला होता. तथापि, पंचायत समिती, परभणी येथील २२ बळीराम नांगर उर्वरित कृषी साहित्याचे सुट्टे भाग दिनांक ३ ऑगस्ट, २०१३ रोजी चोरीला गेले व १९८ नांगरांचे वितरण करण्यात आले नाही. याप्रकरणी साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की,

नांगराचे सुटे भाग म्हणजे फाळ चोरीला गेले आहेत नांगर शिल्लक आहेत परंतु फाळ नसल्यामुळे सदर नांगर शेतकऱ्यांना वितरण करता आले नाहीत. तसेच एकूण १९८ बळीराम नांगरांपैकी लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांचे मागणीनुसार १७६ नांगराचे वाटप करण्यात आले. सदर नांगरचोरी प्रकरणी सन २०१३ मध्ये पोलिसांकडे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे व सन २०१४ मध्ये दोषारोप दाखल केलेले आहे. तथापि याप्रकरणी गोदामपाल व रखवालदार व संबंधितांची जबाबदारी निश्चित करून तात्काळ कारवाई करणे अपेक्षित असतांना कोणतीही कार्यवाही केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही त्यामुळे समिती तीव्र नापंसती व्यक्त करीत आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरण मा. न्यायालयात सुनावणीसाठी आहे. प्रत्येक सुनावणीच्यावेळी जिल्हा परिषदेच्या वतीने त्यांचे वकील उपस्थित राहत आहेत परंतु मा. न्यायालयाने पुढील तारीख दिलेली आहे. हे प्रकरण मा. न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे तोपर्यंत ठीक आहे परंतु याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्रथमदर्शनी कार्यवाही होणे अपेक्षित होती ती झालेली नाही गोदाम मधील विद्युत पंप, बैलनांगर व नांगराचे सुट्टे भाग अज्ञात चोरट्याने चोरुन नेले असा गुन्हा प्रथमदर्शनी अहवालामध्ये (एफआयआर) नमूद करण्यात आलेला आहे. चौकशीच्या अहवालात साहित्य गोदामामध्ये कधी ठेवण्यात आले, याचा उल्लेख नाही. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या वतीने याप्रकरणावरील सुनावणीच्या तारखेच्या दिवशी सरकारी वकील हजर असतात. जिल्हा परिषदेकडून आवश्यक तो पुरावा न दिल्यामुळे विलंब झालेला आहे. याचा अर्थ असा की, **या प्रकरणाशी संबंधित कर्मचाऱ्यांना एक प्रकारे संरक्षण देण्याचा प्रकार जिल्हा परिषद प्रशासन करीत असून याबाबत समिती खेद व्यक्त करते. प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषदेने आवश्यक ते सर्व पुरावे सादर करून मा. न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून लवकरात लवकर कारवाई करावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

### पंचायत समिती उपकराची रक्कम खर्च न केल्याबाबत (पंचायत समिती, मानवत)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीचे सन २०१२-१३ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न किती होते व उक्त वर्षात कोणकोणत्या बाबींवर किती खर्च झाला, सन २०१५ अखेर पंचायत समितीकडे किती रक्कम शिल्लक होती व रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत, सुरुवातीची शिल्लक रु.९०,८८८ होती. त्यामधून समाज कल्याण व महिला बाल कल्याण या आवश्यक सदरावर रु.६३,७०० खर्च झालेला आहे. उर्वरित रक्कम रुपये ३,१५,१४४ ही दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी प्राप्त झाल्यामुळे अहवाल वर्षात खर्च होऊ शकला असे नमूद केलेले आहे. सन २०१२-१३ मध्ये एकूण अंदाजपत्रक ३ लाख रुपये होते. त्यापैकी केवळ ६३,७०० रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. उर्वरित रक्कम का खर्च होऊ शकली नाही, यावर सहायक लेखा अधिकारी, यांनी समितीस माहिती विशद केली की, दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी रक्कम प्राप्त झालेली आहे.

समितीने पुढे निदेश दिले की, सहायक लेखा अधिकारी, यांनी अर्थसंकल्प मंजूर करून त्याला जिल्हा परिषदेची मंजुरी घेतलेली आहे. परंतु, आपण २ वर्षे रक्कम खर्च केलेली नाही, ही शोकांतिका आहे. पंचायत समितीने सर्वसाधारण सभेने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च, २०१३ ते ३० मार्च, २०१५ या कालावधीत रक्कम खर्च केलेली नसल्यामुळे गट विकास अधिकारी व सहायक लेखा अधिकारी कारवाईस पात्र आहेत. गट विकास अधिकारी व सहायक लेखा अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

दिनांक ३१ मार्च, २०१३ ते दिनांक ३० मार्च, २०१५ या कालावधीत जिल्हा परिषदेची मंजूरी घेऊनही त्या कालावधीत रक्कम खर्च न केल्याप्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार गटविकास अधिकारी, यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय नसल्यास विलंबाची करणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मार्च २०१३ ते मार्च २०१५ या कालावधीतील जमा व खर्चाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | सुरूवातीची शिल्लक | जमा | एकुण प्राप्त | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ९०८८८ | ३१५१४४ | ४०६०३२ | ६३७०० | ४३२३३२ |
| २०१३-१४ | ३४२३३२ | ५७८३४०० | ६१२५७३२ | १४९७२५ | ५९७६००७ |
| २०१४-१५ | ५९७६००७ | २४२८४०६ | ८४०४४१३ | ६२०९४५४ | २१९४९५९ |
| २०१५-१६ | २१९४९५९ | ४४८६०४ | २६४३५६३ | २५८४००२ | ५९५६१ |

सन २०१४-१५ मधील रूपये २१,९४,९५९ अखर्चित निधी हा माहे मार्च २०१५ अखेर प्राप्त असल्याने (दिनांक २७ मार्च, २०१५ रूपये १४,६३,०९३ व दिनांक ३१ मार्च, २०१५ रूपये ६,९४,३१६) ही रक्कम दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत खर्च होऊ शकली नाही परंतू सदर रक्कम सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात घेऊन खर्च करण्यात आली. सन २०१५-१६ या वर्षात एकूण प्राप्त २६,४३,५६३ पैकी रूपये २५,८४,००२ खर्च करण्यात आले.

वरील नमुद वस्तुस्थिती पाहता पंचायत समिती स्तरावरून विलंब झालेला नाही. त्यामुळे गटविकास अधिकारी व सहायक लेखा अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-२) सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषदेकडून रूपये ५९७६००७ इतकी रक्कम अखर्चित राहिली असल्याचे दिसून येत असून यासंबंधात जिल्हा परिषदेकडून पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरुन कार्यवाही करण्यात आलेली नाही. याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व विद्यमान व तत्कालीन अधिकारी / कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्याबाबतचे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना देण्यात येत आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान पंचायत समिती, मानवत येथील अंदाजपत्रका संदर्भातील विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी उपकराची रक्कम अखर्चित रहाण्याबाबत समितीस माहिती दिली की, सन २०१३-२०१४ ते सन २०१४-२०१५ पर्यंत बजेटची रक्कम पंचायत समितीने पूर्णपणे खर्च केली नव्हती. तत्कालीन गट विकास अधिकारी यांना यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्याबाबत त्यांचा खुलासा देखील आलेला आहे.

तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यांचा असा खुलासा आलेला आहे की, वाढीव उपकराची रक्कम शासनाकडून उशिरा प्राप्त झाली होती व त्यामुळे ही रक्कम त्यावर्षी खर्च करू शकले नाही. सन २०१३-२०१४ चे ५७ लाख ८३ हजार रूपये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ आणि दिनांक ५ मार्च, २०१४ मध्ये प्राप्त झाले होते. त्यामुळे ही रक्कम त्यावर्षी खर्च होऊ शकली नाही. परंतु ही रक्कम पुढील वर्षी खर्च केलेली आहे. यावर समितीने या उत्तरातून सचिवांचे समाधान झाले आहे काय, असा प्रश्न विचारला असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, सदरहू रक्कम दोन टप्प्यामध्ये पंचायत समितीला प्राप्त झाली. दुसरा टप्पा दिनांक ५ मार्च, २०१४ रोजी प्राप्त झाला होता. त्यामुळे त्यांच्याकडे पूर्ण दिवस शिल्लक नव्हते. परंतु सदरहू रक्कम व्यपगत होत नाही. प्रत्येक जिल्हा परिषदमध्ये फेब्रुवारी-मार्च मध्ये पैसे पाठविले जातात. तद्नंतर समितीने विचारणा केली की, शासन स्तरावरून हा निधी फेब्रुवारी-मार्च पूर्वी जिल्हा परिषदेला मिळाला पाहिजे, जेणेकरून हा निधी त्या त्या वर्षामध्ये विकासकामांवर खर्च होईल.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, हा निधी मालमत्ता नोंदणीचा म्हणजेच शासनाचा आहे. हा निधी आयजीआरच्या स्तरावर संकलित करून शासनाकडे पाठविण्यात येतो. सदर निधी दरमहा त्या स्तरावरच द्यावा. परंतु ती रक्कम बजेट होत असल्याने बजेटच्या स्वरूपात दिली जाते. त्यामुळे ही रक्कम वर्षाच्या शेवटी प्राप्त होते. परंतु ही रक्कम व्यपगत होत नाही. पुढे समितीने विचारणा केली की, ही रक्कम डिसेंबर महिन्यात मिळाली तर वेळेत खर्च होऊ शकते. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, ही रक्कम प्राप्त होणार असल्याचे जिल्हा परिषदेला माहीत असते. त्यामुळे ते अंदाजपत्रक करतात. परंतु पैसे प्राप्त झाल्याशिवाय अभिलेखे देता येत नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार पंचायत समिती मानवत संदर्भात साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, दिनांक ३१ मार्च, २०१३ ते दिनांक ३० मार्च, २०१५ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेची मंजुरी होऊनही उक्त कालावधीत मानवत पंचायत समितीने रक्कम खर्च केली नाही. ग्रामविकास विभागाच्या अभिप्रायानुसार सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषदेकडून रूपये ५९,७६,००७/- इतकी रक्कम अखर्चित राहिली असल्याचे दिसून येते यासंबंधात जिल्हा परिषदेकडून पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार गटविकास अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व विद्यमान व तत्कालीन अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी असे निदेश देण्यात आले होते. यासंदर्भात दिनांक ८ जानेवारी, २००९ रोजी विभागीय सचिवासमवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, मानवत येथील अंदाजपत्रकानुसार सन २०१३-१४ ते सन २०१४-१५ पर्यंतची अंदाजपत्रकातील रक्कम पंचायत समितीने पूर्णपणे खर्च केली नसल्यामुळे तत्कालीन गटविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यामध्ये त्यांनी वाढीव उपकराची रक्कम शासनाकडून उशिरा प्राप्त झाली होती व त्यामुळे ती रक्कम त्यावर्षी खर्च करता आली नाही, परंतु सदर रक्कम पुढील वर्षी खर्च केलेली आहे असे नमूद केले. याबाबत ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीला अवगत केले की, शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम जिल्हापरिषदेला प्राप्त होणार असल्याचे जिल्हापरिषदेला माहित असते. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात येते परंतु रक्कम प्राप्त झाल्याशिवाय अभिलेखे देता येत नाही या उत्तरावर समितीने समाधान व्यक्त केले. तथापि, **जिल्हा परिषदेला शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम माहे मार्च ऐवजी माहे डिसेंबर मध्ये वितरीत करण्यात यावी जेणेकरून शासनाचा मोठा निधी अखर्चित राहणार नाही व ज्या प्रयोजनांसाठी सदर रक्कम आवंटीत केलेली आहे ती कामे निधीअभावी अडचणीत येणार नाही अशी समिती शासनाकडे शिफारस करीत आहे त्यादृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## खोरस आरोग्य उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, परभणी तालुक्यातील जांब उपकेंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. कारेगांव, टाकळी (बो.) उपकेंद्राचे बांधकाम प्रगतीत आहे. शेंद्रा उपकेंद्रासाठी जागा प्राप्त नाही. पालम तालुक्यातील खोरस उप केंद्राच्या इमारत बांधकामासाठी निधी देण्यात आला होता. परंतु, तिथे जागेचा वाद आहे. मानवत तालुक्यातील शेवडी येथील उप केंद्रासाठी जागा प्राप्त नाही. तसेच, पाथरी तालुक्यातील उमरा उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी निधी देण्यात आला होता. परंतु, तिथेही जागेचा वाद असल्याचे नमूद केलेले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, उप केंद्राच्या इमारत बांधकामास मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीकडे जागेची मागणी केली जाते. परंतु, अद्याप ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

समितीने पुन्हा विचारणा केली की, लेखी माहितीमध्ये जागेचा वाद असल्याचे नमूद केलेले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस उप केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नाही असे उत्तर दिले. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, लेखी माहितीमध्ये जागा उपलब्ध होत नाही असे नमूद करावयास पाहिजे होते. परंतु, खोरस व उमरा येथील उप केंद्राच्या बांधकामासाठी जागेचा वाद असल्याचे नमूद केलेले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस खुलासा केला की, जागेचा वाद नाही. खोरस व उमरा येथील उप केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नाही. यावर समितीने विचारणा केली की, पालम तालुक्यातील खोरस उप केंद्र व पाथरी तालुक्यातील उमरा उप केंद्राच्या बांधकामासाठी जागेचा वाद आहे काय, यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस नाही असे उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, पाथरी तालुक्यातील वाघाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, उमरा उप केंद्राच्या बांधकामासाठी निधी देण्यात आला होता. परंतु, जागेचा वाद असल्याचे नमूद केलेले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, पाथरी तालुक्यातील वाघाळा प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधून तयार आहे. आता त्या इमारतीचा वापर करीत आहोत. यावर समितीने विचारणा केली की, पालम तालुक्यातील खोरस उप केंद्राला भेट दिलेली आहे काय, यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस नाही असे उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, उप केंद्राची पाहणी न करता चुकीचे उत्तर नमूद करावयाचे कारण काय आहे, बांधकामासाठी निधी देण्यात आला होता असे लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, माहिती घेऊन ती समितीला सादर करण्यात येईल. खोरस उप केंद्राचे काम रद्द करण्यात आलेले आहे. अद्याप उप केंद्राच्या बांधकामासाठी जागाच उपलब्ध झालेली नाही. पुढे जिल्हा आरोग्य अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा आरोग्य अधिकारी समितीला चुकीचे उत्तर देत आहेत व समितीची दिशाभूल करीत आहेत. ज्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही त्याबाबतची माहिती लेखी उत्तरामध्ये का नमूद केली. जागा उपलब्ध झाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता मिळू शकत नाही. समितीला उत्तर देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही आणि लेखी उत्तरामध्ये मात्र बांधकामासाठी निधी देण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. कार्यकारी अभियंता यांनी असे विदित केले की, सदर काम रद्द करण्यात आलेले आहे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी सांगतात की, प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे समितीला दिशाभूल करणारी उत्तरे दिली जात आहेत. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणी तात्काळ चौकशी करावी. खोरस उप केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. एखाद्या कामासाठी जागा उपलब्ध होत नसेल तर दुसऱ्या जागेची मागणी केली पाहिजे. आपण दुसऱ्या जागेची मागणी केलेली आहे काय? ज्या ठिकाणी जागेचा वाद आहे तेथे जागा उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे उत्तर दिले की, खोरस उप केंद्रासाठी जागा उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले की, महसूल विभागाची जागा मिळत नसेल तर आपल्याला वन विभागाची जागा घेता येते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उप केंद्रासाठी जागा, प्रशासकीय मान्यता, इमारतीचे बांधकाम, निधीची उपलब्धता, मंजुरीचे आदेश या सर्व गोष्टी तात्काळ तपासून घेतल्या पाहिजेत. जागेचा वाद असेल किंवा काम रद्द झाले असेल तर त्याबाबत माहिती घ्यावी आणि अहवाल तयार करावा. संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशा प्रकारे चुकीची माहिती देणे योग्य नाही. संबंधित अधिकारी अशा प्रकारे उत्तर देऊन

समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अधिकाऱ्यांनी समितीला नेमके उत्तर द्यावे. सर्वसामान्य जनतेला शासकीय योजनांचा लाभ मिळाला पाहिजे, सोईसुविधा मिळाल्या पाहिजेत. आरोग्य हा विषय संवेदनशील आहे. आपण या प्रकरणी तात्काळ चौकशी करावी आणि समितीला दिशाभूल करणारे उत्तर दिल्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करून समितीला माहिती सादर करावी.

समितीने अशी विचारणा केली की, ते सेवाही देत नाहीत आणि त्यांच्यावर कारवाई करून पदे रिक्तही करून घेत नाही. त्यामुळे डॉक्टरांची पदे भरलेली दिसतात. काही डॉक्टर पी.जी.साठी जातात व त्यामुळेही डॉक्टर उपलब्ध नसताना पदे भरलेली दिसतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले की, गैरहजर असलेल्या डॉक्टरांवर कारवाई करु.

यावर समितीने निदेश दिले की, काही डॉक्टर मुख्यालयी रहात नाहीत म्हणून आपण त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे. पण जे डॉक्टर सेवाच देत नाहीत, परागंदा आहेत, त्यांच्या विरुध्द काहीही कारवाई केलेली नाही. संपूर्ण राज्यात हा प्रश्न आहे. मोठ्या प्रमाणावर डॉक्टरांच्या जागा रिक्त आहेत. हा ग्रामीण आरोग्याचा प्रश्न आहे. डॉक्टर अनुपस्थित राहतात. पण प्रशासनाला त्यांची माहिती नसते. त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीची अशी सूचना आहे की, परभणी जिल्ह्यातील एकही प्राथमिक आरोग्य केंद्र डॉक्टरांविना राहता कामा नये. सर्व ठिकाणी किमान एक तरी डॉक्टर असले पाहिजेत. तात्पुरती व्यवस्था करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. त्याप्रमाणे ही व्यवस्था करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) खोरस आरोग्य उप केंद्रासाठी जागा उपलब्ध नसल्याप्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व समितीला दिशाभूल करणारे उत्तर दिल्याप्रकरणी संबंधितांविरूध्द कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, सेलू येथील डॉक्टर परागंदा असल्यामुळे रुग्णांना सेवा मिळत नसल्याने नियमानुसार १ ते ४ जोडपत्र देऊन सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्याबाबत समितीने निर्देश दिल्यानुसार कोणती कारवाई केली आहे, तसेच डॉक्टरांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) प्राथमिक आरोग्य केंद्र चाटोरी ता.पालम अंतर्गत उपकेंद्र खोरस येथे नविन इमारत बांधकामासाठी उपलब्ध झाल्यानंतर बांधकामाचे नियोजन करण्यात आले. सन २०१०-११ मध्ये सदर कामास दिनांक ३ मार्च, २०११ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली. त्यानुसार इमारत बांधकाम करण्यात बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, परभणीकडे प्रकरण वर्ग करण्यात आले. तद्नंतर दिनांक ३१ मार्च, २०१२ अन्वये बांधकामासाठी कार्यरंभ आदेश देण्यात आले होते. प्राप्त निधी मधून सन २०१२-१३ पर्यंत बांधकाम सुरू झाले नसल्यामुळे विभागाने दिनांक १६ डिसेंबर, २०१३ अन्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना लेखी पत्र देऊन बांधकाम सुरू करणेबाबत कळविण्यात आले होते. दरम्यान सदरील काळात जागेचा वाद निर्माण झाल्यामुळे सन २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायतीने उपकेंद्र बांधकामासाठी दिनांक १९ डिसेंबर, २०१४ अन्वये दुसरी जागा उपलब्ध करून दिली. परंतु उप केंद्रास उपलब्ध करून देण्यात आलेला निधी दिनांक ३१ मार्च, २०१४ मध्ये व्यपगत झाल्यामुळे सदरील बांधकाम सुरू होऊ शकले नाही. अहवाल वर्ष सन २०१८-१९ मध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रूपये ८०,०० लक्ष तरतुदीची मागणी करण्यात आली आहे.

मा. पंचायती राज समितीला व्यवस्थित उत्तर न दिल्यामुळे तत्कालीन प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉक्टर आर.डी.खंदारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावून ताकीद देण्यात आली आहे.

(२) डॉ. प्रगती बाबुराव दहिफळे वैद्यकीय अधिकारी, देऊळगाव, ता. सेलू हया दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ पासून अनाधिकृत गैरहजर आहेत. त्यांच्या अनाधिकृत अनुपस्थिती बाबत त्यांचेविरूध्द कार्यवाही चालू आहे. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परभणी अंतर्गत ३१ प्रा.आ.केंद्र आहेत. त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी, गट अ ची एकूण ६६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५२ पदे भरलेली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

मा. समिती प्रमुख, पंचायती राज समिती यांचे निर्देशानुसार, ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुरळीत होण्याचे दृष्टीकोनातून जिल्हा परिषद स्तरावर ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तेथील एका वैद्यकीय अधिकारी यांना रिक्त पद असलेल्या प्रा.आ.केंद्राचा तात्पुरत्या स्वरूपात आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे बाबत जबाबदारी देण्यात यावी.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-**

(१) जिल्हा परिषद, परभणी यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

(२) वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीबाबत नियमानुसार कार्यवाही सुरू आहे. दिनांक १३ जुलै, २०१८ रोजी ७२३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याकरिता जाहिरात देण्यात आली असून जिल्हाधिकारी स्तरावर समिती गठीत करून Walk In Interview च्या माध्यमातून ही पदे भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, देऊळगाव, ता. सेलू जि.परभणी येथे दोन पदे मंजूर असून एक पद भरलेले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, खोरस आरोग्य उप केंद्राप्रकरणी जागा उपलब्ध नसल्याप्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, सन २०१०-२०११ मध्ये जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधीतून (फंडातून) हे काम होणार होते व त्याचा कार्यारंभ ओदश देण्यात आला होता. सन २०११-२०१२ मध्ये कामाची सुरूवात झाली नाही. या कामाची सुरूवात सन २०१२-२०१३ मध्ये झाली. परंतु सदरहू जागेच्या शेजारी स्मशान भूमी होती, ही बाब नंतर लक्षात आली. सदरहू प्रकरणी ग्रामपंचायती अंतर्गत वाद निर्माण झाले. त्यामुळे सदरहू काम थांबले व दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी कामाचा निधी व्यपगत झाला. उक्त कामासाठी आता नवीन जागा उपलब्ध झाली असून डीपीडीसीमधून सदरहू काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे अधिकारी यासंदर्भात अधिक माहिती देऊ शकतील. पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, सदरहू जागेला लागून स्मशान भूमी होती. माहे डिसेंबर, २०१३ मध्ये ग्रामपंचायतीने एक पत्र दिले होते. त्यामध्ये नमूद करण्यात आले होते की, सदरहू जागेवर बांधकाम करण्यात येऊ नये.

यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीचे पत्र केव्हा प्राप्त झाले होते, बांधकामास कार्यारंभ आदेश केव्हा देण्यात आला होता, यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, माहे डिसेंबर,२०१३ मध्ये प्राप्त झाले होते. दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला होता.

समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामपंचायतीच्या परवानगी शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा निवडण्यात आली होती का, ज्या गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्राचे बांधकाम करावयाचे असते त्या गावाच्या ग्रामपंचायतीचा ठराव व नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात येत असते. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, अगोदर ग्रामपंचायतीचा ठराव होता. परंतु त्यांनी तो नंतर बदलला. सदरहू कामासाठी सन २०१८-१९ मध्ये डीपीसीमधून निधीची मागणी करण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पहिल्या वेळी देखील ग्रामपंचायतीनेच जागा उपलब्ध करून दिली असेल. तरी देखील उक्त बांधकाम का थांबले होते, पूर्वी जिल्हा परिषदेने जागा उपलब्ध करून दिली होती का, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून दिली होती. परंतु सदरहू जागा स्मशान भूमी लगत असून ती उंच, सखल व पाणी प्रवाहातील असल्याने ग्रामपंचायतीमध्ये अंतर्गत वाद झाल्याने उक्त जागेवर बांधकाम करू नये, असे त्यावेळी ग्रामपंचायतीने सांगितले होते.

समितीने विचारणा केली की, कोणतीही जागा एखाद्या सार्वजनिक सुविधेसाठी निवडण्यात येते त्यावेळी सर्व विभागांची नाहरकत घेण्यात येते. एमएसईबीची पावर लाईन त्या जागेवरून गेली आहे काय, शेजारी स्मशान भूमी आहे काय, इत्यादी बाबींच्या संदर्भात जाहिरनामा प्रसिद्ध करून त्यानंतर ती जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ वाटप करण्यात येते. अशी कार्यवाहीची पद्धत असताना उक्त प्रकरणी स्मशान भूमी अगोदर दिसली नाही का, यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू जागेच्या बाजूला स्मशान भूमी आहे.

समितीने विचारणा केली की, गावातील सर्व स्मशान भूमी या गावाच्या लगत आहेत. स्मशान भूमीतील प्रेत जळताना दिसते म्हणून भिंती बांधून देण्याची मागणी लोक आता करू लागले आहेत. उक्त जागेच्या बाजूला स्मशान भूमी आहे, ही बाब अगोदर माहिती नव्हती का, ग्रामपंचायतीच्या नाहरकती शिवाय कार्यारंभ आदेश कसा दिला. उक्त प्रकरणी दुहेरी भूमिका घेतल्याबाबत ग्रामपंचायतीवर कोणती कारवाई केली. मागील ८ वर्षापासून ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याशी आपण खेळत आहात. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरू झाल्यानंतर ते थांबविण्यात आले आहे. आता उक्त काम जिल्हा नियोजन विकास समितीतून करण्यात येणार, अशी माहिती देण्यात येत आहे हे उत्तर चुकीचे आहे. सदरहू कामाचे नियोजन विभागाला करावयाचे आहे. जिल्हा नियोजन विकास समिती बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देते. प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र, आयुर्वेदिक दवाखाना बांधकाम, त्यांची दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करून दिल्यानंतर त्याचे नियोजन जिल्हा

परिषदेच्या सर्वसाधारण सभेला करावयाचे आहे. ८० लाख रुपयांची मागणी कामासाठी केली अशी माहिती देत आहात. उक्त निधीची मागणी कोणाला केली, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केली आहे असे उत्तर दिले.

तद्नंतर समितीने उप सचिव, ग्राम विकास विभाग यांनी विचारणा केली की, प्राथमिक उप केंद्राची जागा निवड करून त्याच्या इमारतीच्या बांधकामासाठी ८० लाख रुपयांची जिल्हा नियोजन समितीकडे मागणी केली, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली आहे. अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये जिल्ह्याच्या मंजूर प्लॅनसाठी अंदाजे २ ते ४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. जिल्हा परिषदेकडून लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात येते की, डीपीडीसीला ८० लाख रुपयांची मागणी केली आहे. त्यांच्याकडून निधी मागण्याची काही आवश्यकता नाही. जिल्हा परिषदेकडे निधी उपलब्ध असून त्याचे नियोजन करून सर्वसाधारण सभेसमोर विषय मांडून त्यास मान्यता घेतली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीची काहीही तयारी केलेली नाही. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सन २०१८-१९ करिता आता निधी प्राप्त झाला असून पुढील वर्षी त्याचे नियोजन करण्यात येईल.

यानंतर समितीने विचारणा केली की, ८ वर्षापासून आरोग्य उप केंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण झालेले नाही. त्यासाठी डीपीसीकडे मागणी केली, अशी माहिती देण्यात येत आहे. त्यांच्याकडे मागणी करण्याची काहीही आवश्यकता नाही. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केली की, सदरहू विषय जिल्हा परिषदेचा असून डीपीसी निधीतून सदरहू बांधकाम करण्यात येते. सुरुवातीला उप केंद्राच्या इमारतीसाठी ग्रामपंचायतीने ठराव करून कागदपत्रांची पूर्तता केली. उक्त बांधकाम प्रकरणी कार्यारंभ आदेश देण्यात आला व कामास सुरुवात करण्यात आली. परंतु त्यानंतर ग्रामपंचायतीने उक्त ठिकाणी बांधकाम करू नये असे सांगितले.

यावर समितीने असा प्रश्न उपस्थित केला की, सदरहू बांधकाम मागील ३ वर्षापासून बंद आहे. यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, शासनाचा नियम आहे की, कामाचा निधी २ वर्षानंतर व्यपगत होतो. सदरहू कामाचा कालावधी २ वर्षापेक्षा अधिक झाल्याने त्याचा निधी ३१ मार्च, २०१४ रोजी व्यपगत झाला. ग्रामपंचायतीने पुन्हा ठराव करून नवीन जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी सन २०१८-१९ मध्ये काम करण्याकरिता ८० लाख रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे.

यावर समितीने निदेश देत विचारणा केली की, ग्रामपंचायतीने चूक केली आहे. उक्त काम मंजूर झाल्यानंतर त्या जागेच्या बाजूला स्मशान भूमी वेळेवर अवतरली का? सन २०११-१२ मध्ये कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला. सन २०१३ मध्ये ग्रामपंचायतीने हरकत घेतली, जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीवर ३९ (१) अंतर्गत कारवाई का केली नाही, ग्रामपंचायतीचे ना-हरकत काम सुरू करण्यापूर्वी घेतली होती का, नसेल तर कामाचा कार्यारंभ आदेश कसा दिला. यासर्व प्रश्नांची उत्तरे समितीला अद्याप मिळालेली नाहीत अशी नाराजी समितीने व्यक्त केली असता प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, ग्रामपंचायतीने सन २००२-०३ मध्ये ठराव करून प्रस्ताव सादर केला होता.

समितीने विचारणा केली की, उक्त ठरावाची अंमलबजवणी सन २०११ मध्ये करण्यात आली. ग्रामपंचायतीचा कोणताही ठराव ६ महिन्यांनंतर वैध असतो का, ग्रामपंचायतीने सन २००२ मध्ये आरोग्य केंद्रासाठी जागा दिल्यानंतर सन २०११ मध्ये कामास सुरुवात करण्यात आली. मागील १७-१८ वर्षापासून उक्त कामाची कार्यवाही अद्यापपर्यंत अपूर्ण आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आता देखील सांगत आहे की, डीपीसीला सदरहू कामासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे. स्वायत्त संस्थेसाठी नियोजन करून दिल्यानंतर त्याचे नियोजन कोण करणार, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू कामासाठीचा निधी २ वर्षापूर्वी व्यपगत झाल्याने त्यासाठी पुन्हा मागणी करावी लागेल.

समितीने विचारणा केली की, परभरणी जिल्हा परिषदेला यावर्षी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी किती तरतूद करण्यात आली आहे, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, डीपीसीला नियोजननिहाय यादी देऊन निधीची मागणी करण्यात येते. डीपीसीने अत्यल्प प्रमाणात निधी मंजूर केल्यामुळे व आरोग्य समिती किंवा जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा यांचे नियोजन बदलत असते. आरोग्य उप केंद्रासाठी सन २०१८-१९ मध्ये ३३० लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली होती व १०५ लक्ष रुपये निधीची उपलब्ध करून दिला आहे.

समितीने विचारणा केली की, डीपीसीचा जिल्ह्याच्या प्लॅन किती रुपयांचा आहे, तो जनरलमध्ये आहे काय, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, जनरलमध्ये जिल्ह्यासाठी १४४ कोटी रुपयांचा आराखडा आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू निधीतून केवळ १०५ लक्ष रुपये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपलब्ध करून दिला आहे. डीपीसीमध्ये जिल्हा परिषदेच्या सदस्यांची संख्या अधिक आहे. डीपीसीचा आराखडा अंतिम करण्यात येतो. डीपीसीमध्ये जिल्ह्यातील एकूण ३६ सदस्यांपैकी २१ सदस्य जिल्हा परिषदेचे असताना त्यांच्या वाट्याला कमी निधी प्राप्त होतो. जिल्हा परिषदेच्या सदस्यांना डीपीसीच्या बैठकीपूर्वी अधिकाऱ्यांनी पूर्वचर्चा (ब्रिफिंग) केली पाहिजे.

७३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून डीपीसी अस्तित्वात आली असताना त्याबातचे अधिकार जिल्हा परिषदेला माहिती नाहीत. त्यामुळे आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी १०५ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला आहे. विभागाचे उप सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली उत्तरे समाधानकारक नाहीत. ग्रामपंचायतीने सन २००२ मध्ये जागा दिली होती व त्यामध्ये सन २०१३ मध्ये बदल करण्यात आला आहे. परंतु अद्यापही सन २०१८ पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरू झालेले नाही अशी समितीने नाराजी व्यक्त करून पुढे निदेश दिले की, सन २००२ पासून ते सन २०१३ व सन २०१८ हा कालावधी फार मोठा आहे. जवळपास १६ वर्षे झालेली आहेत. हा प्राथमिक स्वास्थ्य केंद्राचा विषय आहे. आरोग्य सेवा ही अत्यावश्यक बाब असल्यानंतरही त्याकरिता एवढा मोठा विलंब झालेला आहे. यामध्ये फार मोठी दिरंगाई झालेली दिसून येत आहे. या प्रकरणामध्ये दिरंगाई होण्यामागचे कारण काय आहे, कोणाच्या चुकीमुळे एवढा उशीर झालेला आहे, हे प्रकरण आता कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, कुठल्याही प्रश्नाचे समर्पक उत्तर मिळालेले नाही. यामुळे समितीचे समाधान होण्यासारखे दिसत नाही. समितीने वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न उपस्थित केले, त्यातील एकाही प्रश्नाचे उत्तर व्यवस्थितरित्या मिळालेले नाही.

समितीने पुढे असेही निदेश दिले की, या संदर्भामध्ये जो विलंब झालेला आहे त्या विलंबाची कारणे काय आहेत, त्याकरिता कोण जबाबदार होते याची तात्काळ चौकशी करून ही दिरंगाई करण्यामध्ये जर कोणाचा निष्काळजीपणा असेल तर त्याच्यावर जबाबदाऱ्या निश्चित झाल्या पाहिजेत. त्या पूर्ण चौकशीचा अहवाल दिला पाहिजे. कुठे दिरंगाई झाली असेल, कोणी केली असेल त्यांच्यावरील कारवाईसहचा चौकशीचा अहवाल या १५ दिवसांत सादर करावा.

यानंतर समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र, शेलू येथील डॉक्टर परागंदा असल्यामुळे रुग्णांना सेवा मिळत नसल्यामुळे नियमानुसार १ ते ४ जोडपत्र देऊन सेवेतून कायमस्वरुपी बडतर्फ करण्याबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार कोणती कारवाई केली आहे, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, संबंधित चिकित्सकांना सेवेतून काढण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तो प्रोसेस करून मंत्री महोदयांकडे आदेशार्थ सादर केलेला आहे. काही दिवसांत त्यावर अंतिम निर्णय होईल. तसेच अनधिकृतरित्या अनुपस्थित असलेल्या ६५९ डॉक्टरांची यादी केली होती. त्यापैकी ९९ डॉक्टरांना सेवेतून काढून टाकण्यात आलेले आहे. मध्ये शासनाने असे धोरण स्वीकारले होते की, जे रुजू होण्यास इच्छूक आहेत त्यांच्याकडून मागे झालेल्या सेवेचा लाभ घेणार नाही, ती असाधारण रजा होईल, पेन्शनची जुनी स्कीम लागू होणार नाही असे एक हमीपत्र घेऊन, बऱ्याच अटी घालून ८५ डॉक्टरांना परत सेवेत घेतले. २३ डॉक्टरांना सेवेतून काढण्याबाबतचे प्रपोजल हे फायनल स्टेजला मंत्री महोदयांकडे सादर झालेले आहे. ९५ डॉक्टरांकरिता सामान्य प्रशासन विभागाने (जी.ए.डी.) वृत्तपत्रात जाहिरात देण्यास सांगितले आहे. त्यानुसार ९५ डॉक्टरांसाठी जाहिरात देणार आहोत. ३०२ प्रकरणे निकालावर आलेली आहेत. उर्वरित प्रकरणांवर वेगवेगळ्या स्तरावर कारवाई सुरू आहे.

यासंदर्भात समितीने विचारणा केली की, तुम्ही शासनाच्या वतीने असे उत्तर दिले आहे की, ७२३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे वॉक इन इंटरव्ह्यूच्या माध्यमातून भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या ७२३ पैकी वॉक इन इंटरव्ह्यूने राज्यामध्ये किती पदे भरली आहेत? यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, ७२३ पदे वॉक इन इंटरव्ह्यूने नाही तर ७२३ पदांकरिता जाहिरात काढली. ७२३ पदांच्या जाहिरातीच्या राज्यस्तरावर ७२३ डॉक्टर भरतीची जाहिरात विभागाने काढलेली आहे. त्याची प्रक्रिया सुरू आहे. याकरिता आम्हाला २ हजारपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्याची छाननी करून आम्ही ती थोड्याच दिवसात भरणार आहोत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ही भरती किती दिवसांत करणार आहात? यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, तेथे रोस्टरमध्ये काही अडचण आलेली आहे. आम्ही विभागीय आयुक्त कोकण यांच्याकडे प्रस्ताव दिला होता. त्याच्या डॉक्युमेंटबद्दल त्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. परंतु असे वाटते की, २ महिन्यांच्या आत आपण ती भरू शकतो. यावर समितीने निदेश दिले की, हे काम कालबद्धरित्या झाले पाहिजे. यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस होय असे उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, परभणी येथे वॉक इन इंटरव्ह्यूच्या माध्यमातून किती पदे भरली गेली. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, मागील वर्षी ११ पदे भरली होती. समितीने पुढे विचारणा केली की, ३५ जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी किती पदे भरली. परभणी जिल्ह्यातील किती पदे भरली, यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस खुलासा केला की, ११ पदे भरली आहेत. तसेच सध्या १८ ची (व्हॅकन्सी) रिक्त आहे. ११ पदे मागच्या वर्षी भरली होती. यावर समितीने विचारणा केली की, या वर्षी पदे का भरली नाहीत, अधिकारी चुकीची उत्तरे देत आहेत. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, वारंवार जाहिरात काढली जात आहे. लोक येतात त्यांना नियुक्ती पत्र दिले जाते. ते थोडे दिवस काम करतात व नंतर नोकरी सोडून जातात. मग परत जाहिरात काढली जाते.

यावर समितीने विचारणा केली की, १८ पदे रिक्त आहेत. त्यांची रिक्वायरमेंट आहे. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस खुलासा केला की, ते बिंदु नामावली वरून (रोस्टर स्टेटवरून) आगोदरच जाहिरात काढलेली आहे. अ वर्गाची (ग्रुप 'ए') पदे असल्याने बिंदु नामावली वरून घेतली आहे. ते बिंदुनामावलीत (रोस्टर) विभागून प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्या बिंदुनामावलीच्या अनुषंगाने किती पदे आहेत याची माहिती

प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिली. नंतर मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर निर्देश आले. एकूण संख्या जास्त असल्याने बिंदुनामावलीतचा विचार न करता तातडीची गरज म्हणून सुरूवातीला नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यामध्ये परवानगी दिली. आता प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याला आम्ही तशी परवानगी दिलेली आहे. त्यांना जर वॉक इन इंटरव्ह्यू मार्फत पदे उपलब्ध होत असतील तर, त्यांनी निश्चितपणे भरावीत.

यावर समितीने विचारणा केली की, शेवटचे इंटरव्ह्यू कधी झाले हे त्यांनी सांगितले नाही. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी रोस्टरबाबत सांगितले. वर्षभरापासून रोस्टर क्लिअर होत नाही काय, रोस्टर क्लिअर केलेच पाहिजे. मागासवर्गीयांना न्याय दिलाच पाहिजे. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सुरुवातीला शासनाने ७५ टक्के पदे भरण्याची परवानगी दिली. तेव्हा काढलेले रोस्टर हे ७५ टक्क्यांप्रमाणे होते. त्याप्रमाणे आपण प्रत्येक जिल्ह्याला कम्युनिकेट केले. अलीकडे शासनाने आपल्याला १०० टक्के पदे भरण्याची परवानगी दिली. आता परत ते रोस्टर काढावे लागत आहे. त्याची प्रक्रिया पूर्ण होऊन ७२३ डॉक्टरांची पदे भरली जाणार आहेत.

यासंदर्भात समितीने निदेश दिले की, राज्यात अनेक ठिकाणी डॉक्टरांची कमतरता असल्याने रुग्णांना आरोग्य सेवा वेळेत मिळत नाही. संदर्भ सेवा दिली जात नाही. ग्रामीण भागात बरीच अडचण आहे. याकरिता डॉक्टरांचे रोस्टर तात्काळ जाहीर होऊन त्यांच्या पोस्ट क्लिअर झाल्या पाहिजे. ही प्रोसेस लगेच सुरू झाली पाहिजे, काही पदे कमी असतील तर ती त्वरीत भरता आली पाहिजे. २ महिन्याची कालमर्यादा दिली असून त्यामध्ये या सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, शेलू येथे रुग्णांना सेवा मिळत नसल्याने जोडपत्र १ ते ४ बाबत कायम स्वरुपी बडतर्फ करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. यावर सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून त्यांना काढून टाकण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. तो प्रस्ताव मंत्री महोदयांकडे या आठवड्यात दिलेला आहे. डिसेंबर २०१७ मधील हा विषय होता. यावर समितीने निदेश दिले की, तात्काळ पाठपुरावा करून यावर त्वरीत कारवाई झाली पाहिजे याची आपण दक्षता घ्यावी.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, परभणी तालुक्यातील जांब आरोग्य उप केंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. शेंद्रा आरोग्य उप केंद्रासाठी जागा उपलब्ध नाही. पालम तालुक्यातील खोरस आरोग्य उप केंद्राच्या तसेच पाथरी तालुक्यातील उमरा आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी निधी देण्यात आला होता. परंतु जागा उपलब्ध होत नाही. तथापि ज्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही त्याबाबतची माहिती लेखी उत्तरामध्ये मात्र आरोग्य उप केंद्राच्या बांधकामासाठी निधी देण्यात आल्याचे नमूद केले आहे व कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, सदर काम रद्द करण्यात आले आहे तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी समितीस विदित केले की, प्राथमिक आरोग्य उप केंद्राला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. यावरून असे दिसून येते की, समितीला जाणीवपूर्वक दिशाभूल करणारी उत्तरे देण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

याप्रकरणी सकृतदर्शनी असे दिसून येत आहे की, खोरस प्राथमिक आरोग्य उप केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. एखाद्या कामासाठी जागा उपलब्ध नसेल तर दुसऱ्या जागेची मागणी करणे आवश्यक होते. खोरस प्राथमिक आरोग्य उप केंद्राच्या नवीन इमारत बांधकामास सन २०१०-११ मध्ये दिनांक ३ मार्च, २०११ रोजी बांधकामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. तथापि, सन २०१२-१३ पर्यंत जागेचा वाद निर्माण झाल्यामुळे बांधकाम सुरू झाले नाही. दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दुसरी जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. परंतु उपलब्ध करून देण्यात आलेला निधी दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी व्यपगत झाला. सन २०१८-१९ मध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रुपये ८० लक्ष तरतुदीची मागणी करण्यात आली आहे. गत ८ वर्षांपासून ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्याची हेळसांड होत आहे.

**प्रस्तुत प्रकरणी खोरस आरोग्य उप केंद्राच्या बांधकामासाठी निधीची तरतूद असताना देखील जागेची निवड योग्य रितीने न केल्यामुळे व नियोजनाचा अभाव असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून या कामाच्या प्रक्रियेत अक्षम्य दिरंगाई झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. सबब, तत्कालिन प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम व संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, सेलू येथील वैद्यकीय अधिकारी (डॉक्टर) परागंदा असल्यामुळे तेथील रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळत नाही. जिल्हा परिषदेकडून प्राप्त लेखी माहितीनुसार सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून अनाधिकृतरित्या गैरहजर आहेत. **आरोग्य विभाग जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत ३१ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ ची एकूण ६६ पदे मंजूर असून त्यापैकी ५२ पदे भरलेली असून उर्वरित १४ रिक्त पदे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## (पंचायत समिती, सेलू)

## रोजगार हमी योजनेतील मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यात जमा करण्यात आल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या निदर्शनास आले की, सेलू पंचायत समितीअंतर्गत कुडा या नावाचे एक गाव आहे. या गावातील रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा केली जात असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. हा एक प्रकारचा गुन्हा असून आर्थिक अफरातफर आहे, असे समितीचे मत आहे. त्यामुळे संबंधित ग्राम सेवकाला तात्काळ निलंबित करून चौकशी करावी, गट विकास अधिकारी यांना निलंबनाचे अधिकार नसतील तर त्यांनी निलंबनाचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवावा, रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांची मजुरी ऑनलाईन बँक अकाऊंटमध्ये जमा करण्याची पद्धत नव्याने सुरू झालेली आहे. त्यामुळे कदाचित हा घोटाळा झाला असावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भातील आढावा घ्यावा, असे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सेलू पंचायत समिती अंतर्गत मौजे कुडा येथे रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा झाल्याप्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार संबंधित ग्रामसेवका विरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सेलू पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत कुडा ता. सेलू येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा झाल्याप्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे त्यानुसार नोंदणीकृत कुटूबांचे यादीची पडताळणी केली असता श्री. रामा ज्ञानोजी ढगे व त्याच्या कुटूंबातील अन्य चार सदस्य मं.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत सिंचन विहिरीवर मजूर म्हणून कामावर होते. श्री. रामा ज्ञानोजी ढगे या व्यक्तीची नोंदणी करण्यात आलेली असून त्याचा जॉब कार्ड नोंदणी क्रमांक एमएच १७-०११-००१/११५ आहे. ज्यात कुटूंब प्रमुख रामा ज्ञानोजी ढगे यांचे बँकेत खाते आहे. त्यांच्या कुटूंबातील इतर सदस्यांचे बँकेत खाते नव्हते. श्री. रामा ज्ञानोजी ढगे यांचा खाते क्रमांक ३३३२८७०७३११ हा आहे. कुटूंबातील इतर सदस्य श्री. सुदाम रामा ढगे (मुलगा) श्री. सुनिल ढगे (नातू) श्री. सतिश सुदाम ढगे(नातू) व श्रीमती अशामती सुदाम ढगे (सून) यांच्या मजुरीची रक्कम कुटुंबप्रमुख श्री. रामा ज्ञानोजी ढगे यांच्या मजुरीची रक्कम कुटुंबप्रमुख श्री. रामा ज्ञानोजी ढगे यांचा खाते क्रमांक ३३३२८७०७३११ वर त्यांनी केलेल्या विनंतीवरून जमा करण्यात आली आहे. हे सर्वच सदस्य एकाच कुटूंबातील असल्यामुळे यात प्रदाने दुसऱ्या कुटुंबाला झाली नसल्याने गैरप्रकार झालेला नाही. याबाबत संबंधित कुटुंबाची कोणतीही तक्रार नाही. त्या कुटुंबाचे कुटुंब प्रमुख व इतर चार मजुरांनी सर्व मजुरी मिळाल्याबाबत जबाब लिहून दिला आहे.

पंचायती राज समितीने निर्देश दिल्याप्रमाणे संबंधित ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. त्याचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी स्वतः सदर कामाची चौकशी केली आहे. ग्रामरोजगार सेवक यांचाही जबाब घेण्यात आला आहे.

संबंधित ग्रामसेवक श्री. बी. एस. शेळगे यांना नेमून दिलेल्या कामात हलगर्जीपणा केल्यामुळे त्यांच्यावर ठपका ठेवण्याचे शिक्षादेश बजावून यापुढे अशा प्रकारे त्याच्या कर्तव्यात कसूर झाल्यास जबर शिक्षेची कार्यवाही करण्यात येईल. अशी ताकीद देऊन त्याच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संबंधित ग्रामरोजगार सेवक श्री. श्रीराम नामदेवराव कांदे यांनाही सक्त ताकीद देण्यात आली आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-७) जिल्हा परिषद स्तरावरून कार्यवाही करण्यात आली आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, सेलू पंचायत समिती

अंतर्गत मौजे कुडा. तालुका सेलू येथे रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यात जमा झाल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्यानुसार संबंधित ग्रामसेवकाविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे? यावर सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, हे सर्व लोक एकाच कुटुंबातील आहेत. श्री. रामा ज्ञानोजी ढगे हे कुटुंब प्रमुख असून उर्वरित ४ लोक त्यांच्याच कुटुंबातील आहेत. त्यांनी रजिस्ट्रेशन करताना एकच खाते क्रमांक दिला होता. त्यामुळे मजुरीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली. त्या सर्व खात्यादारांना त्यांच्या मजुरीचे पैसे मिळालेले आहेत. त्यामुळे कोणतीही अडचण नाही असे, त्यांनी लेखी दिलेले आहे. त्यामुळे आपण या तांत्रिक बाबीमध्ये गेलो तर खूप अडचण होईल. त्यावर उपरोक्त उत्तराच्या अनुषंगाने समितीने समाधान व्यक्त करीत सांगितले की, पंचायती राज समितीचा विषय नसला तरी समिती सांगू इच्छीते की, भूम तालुक्यात चिंचपूर गाव आहे. जो माणूस २ वर्षापासून गावात राहत नाही त्या माणसाने मजुरांच्या सहाय्याने काम करण्यात आले नसल्याबाबत आयुक्तांना पत्र दिले होते. त्या संदर्भात शहानिशा करून काम मजुरांनी केल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. परंतु, अजूनही त्यांचे देयक बाकी आहे. त्यामुळे अशा बाबतीत विभागाकडून सूचना दिल्या गेल्या पाहिजेत. ज्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने काम झाले त्या कामाची बिले काढली जातात आणि ज्या ठिकाणी मजुरांनी काम केले त्या कामाचे बिल काढले जात नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सेलू पंचायत समिती अंतर्गत मौजे कुडा येथे रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा केली जात असल्याचे परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार ग्रामपंचायत कुडा ता.सेलू येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरील ५-५ मजुरांची मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा झाल्याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये श्री. रामा ज्ञानोजी ढगे या मजुराच्या कुटुंबातील अन्य चार सदस्य म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत सिंचन विहिरीवर मजुर म्हणून कामावर होते. श्री. ढगे यांच्या कुटुंबातील अन्य चार सदस्यांचे बँकेत खाते नव्हते केवळ श्री. ढगे यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आली ही सर्व मजुरी एकाच कुटुंबातील असल्याने गैरप्रकार झालेला नाही. तथापि **सर्व मजुर जरी एकाच कुटुंबातील असले तरी सर्वांचीच मजुरी एकाच बँक खात्यामध्ये जमा करणे उचित नाही, याबाबत संबंधित ग्रामसेवकांनी शहानिशा करणे आवश्यक होते असे प्रकार राज्यामध्ये बहुतांश ठिकाणी होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**त्यामुळे एकाच खात्यावर अनेक मजुरांचे देयक जमा केल्याप्रकरणी संबंधितांवर याबाबत कारवाई करण्यात यावी. या चुकीच्या पध्दतीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभाग व संबंधित विभागाने कडक स्वरूपाच्या सूचना निर्गमित कराव्यात अशी समितीची शिफारस आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन माहिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या ५६ नळ पाणी पुरवठा योजनांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमानुसार ५२० कामे हाती घेतल्यानंतर ३०० कामे पूर्ण झाली असून १६४ योजना पूर्ण करण्यात येत आहेत, त्यासंबंधीची सद्यःस्थिती काय आहे, या संदर्भात लेखी स्पष्टीकरणात दिलेली माहिती चुकीची आहे. यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस माहिती विशद केली की, ३ टप्प्यामध्ये पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यात विहिरी, पाईपलाईन व पंपिंग मशीनरी अशी कामे केल्यानंतर टप्पा एक मध्ये गावांना तात्पुरत्या स्वरुपात पाणीपुरवठा करण्यात येतो.

समितीने विचारणा केली की, ज्या गावांमध्ये पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेल्या आहेत त्या गावांना सुध्दा पाणीपुरवठा झालेला नाही. याउलट तुम्ही समितीला टप्पा एकची कामे केल्यानंतर तात्पुरता पाणीपुरवठा केल्याची दिलेली माहिती संयुक्तिक वाटत नाही. लेखी स्पष्टीकरणात ४६४ योजना पूर्ण केल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात ४६४ गावांना कशाप्रकारे पाणी पुरवठा केला जात आहे, यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस माहिती विशद केली की, ५२० योजनांपैकी ४६४ गावांमध्ये तात्पुरता पाणी पुरवठा सुरू केलेला आहे. तसेच ५६ गावांमध्ये योजना बंद आहेत.

समितीने विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणात ४६४ योजना पूर्ण असल्याचे नमूद करावयास पाहिजे होते. परंतु ३०० योजना पूर्ण केल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केले आहे. ही बाब योग्य नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस माहिती विशद केली की, १६४ योजना पूर्ण झालेल्या नाहीत. विहिर आणि पाईपलाईन पूर्ण झाल्यानंतर गावामध्ये पाणी पुरवठा सुरू केला जातो. त्यानुसार लेखी स्पष्टीकरणात ४६४ पाणी पुरवठा योजनेसंबंधी माहिती नमूद केली आहे. समितीने विचारणा केली की, तिसरा टप्पा कोणता आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस माहिती विशद केली की, अंतर्गत वितरण व्यवस्था हा तिसरा टप्पा असतो.

समितीने विचारणा केली की, ५६ योजना पूर्ण झाल्यानंतर त्या बंद झाल्या आहेत असा त्याचा अर्थ आहे. सदर योजना किती रकमेच्या आहेत, एक योजना ५ ते ८ कोटी रुपयांची असू शकते. उदाहरण सांगायचे झाल्यास जवळगाव येथे १ एक कोटी रुपये खर्च करून पाण्याची टाकी बांधण्यात आली. परंतु त्या गावामध्ये २ महिन्यांपासून पाणी पुरवठा सुरू नाही. भारत निर्माण योजना व त्यानंतर मुख्यमंत्री पेयजल योजना सुरू झाली. त्या योजनेचे काम त्या गावातील पाणी वाटप समितीकडे आहे. निधी प्राप्त झाल्यानंतर टाकी बांधली व पाईप लाईन पूर्ण झाली. परंतु वितरणाचे काम राहिले आहे. त्याकरिता वेगळा निधी आवश्यक असतो. परंतु त्या संबंधीची कामे कोणत्याही योजनेत घेता येत नसल्यामुळे अडचणी येत आहेत. परिणामी टाकी व पाईपलाईन पूर्ण झाल्यानंतर सुध्दा पाणीपुरवठा होऊ शकत नाही. आता सध्या मुख्यमंत्री पेयजल योजना सुरू आहे. त्यात अगोदर सुरू असलेली योजना घ्यावयाची असल्यास ती ग्रामपंचायतीने हस्तांतर करून घेतली पाहिजे. परंतु योजना पूर्ण नसल्यामुळे ग्रामपंचायत ती हस्तांतर करून घेत नाहीत. अशा योजनांचा आढावा घेणे आवश्यक आहे. यासंबंधी अनेक तक्रारी येत आहेत. सदर योजना पूर्ण करण्यासाठी राज्य स्तरावर प्रस्ताव द्यावा लागेल. या संदर्भात आयुक्तांनी लक्ष दिले पाहिजे. जेणेकरून त्या योजना पूर्ण होण्यास मदत होईल. हा विषय संपूर्ण महाराष्ट्रात असल्यामुळे याबाबत राज्य स्तरावर चर्चा होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागांमध्ये अपूर्ण योजना कोणत्या वर्षापासून अपूर्ण आहेत, अमरावती जिल्हयात सन २००६-०७ पासून ७२ योजना अपूर्ण असल्यामुळे त्यासंबंधी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आपण लेखी स्पष्टीकरणात कोर्ट केस, पोलीस केस अशी विविध कारणे दिलेली आहेत. योजनांचे काम पूर्ण झाल्यानंतर ५६ योजना बंद झालेल्या आहेत. योजनांचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या ग्रामपंचायतींना हस्तांतरीत करणे अत्यावश्यक होते. त्यानुसार ग्रामपंचायतीकडे सदर योजना हस्तांतरीत झाल्यानंतर त्यांनी विजेची बिले भरली नसल्यास त्या बंद होऊ शकतात. त्या व्यतिरिक्त काही कारणे आहेत का, यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस माहिती विशद केली की, काही पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित न केल्यामुळे बंद झालेल्या आहेत.

समितीने विचारणा केली की, ५६ योजना बंद राहण्याकरिता उद्भव कोरडा, उद्भवास पाणी कमी, सुधारित मंजुरीस होणारा विलंब अशी कारणे नमूद केली आहेत. ही कारणे अपूर्ण योजनांच्या संदर्भात लागू पडतात. योजना बंद राहण्यासाठी सदरहू कारणे योग्य नाहीत. जीएसडीएने उद्भव प्रमाणपत्र दिल्याशिवाय योजना पूर्ण होऊ शकत नाही. यामुळे ५६ योजना बंद होण्याची ठोस कारणे समितीला सांगावीत. तसेच पाण्याचा उद्भव नसताना जीएसडीएने प्रमाणपत्र कसे दिले, यावर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांनी समितीस माहिती विशद केली की, काही बंद योजनांच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरणे सुरू आहेत.

समितीने विचारणा केली की, आपण समितीला चुकीची माहिती देत आहात. ग्रामपंचायतीला योजना हस्तांतरीत झालेल्या आहेत. सदर योजनांची कामे सुरू असताना न्यायालयीन प्रकरणे दाखल होऊ शकतात. विभाग प्रमुखांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना यासंबंधी चुकीची माहिती दिली आहे. लेखी स्पष्टीकरणात चुकीची माहिती दिली आहे. या संदर्भात पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांची साक्ष समिती घेणार आहे. परंतु समितीसमोर सत्य माहिती आली पाहिजे. समितीला असत्य माहिती दिल्यामुळे विशेषाधिकाराच्या भंगाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस माहिती विशद केली की, बंद असलेल्या ५६ पाणीपुरवठा योजनेसंबंधी गावनिहाय आढावा घेऊन नंतर समितीला तातडीने माहिती सादर करण्यात येईल.

समितीने निदेश दिले की, या संदर्भात संबंधित अधिकारी समितीला संविधानिक उत्तर देऊ शकत नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे. या प्रकरणी योजनानिहाय आढावा घेऊन एक महिन्यामध्ये समितीला इत्यंभूत माहिती द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस होकारात्मक उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, जांब सेलू तालुक्यातील जवळगाव या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना पूर्ण असताना देखील तेथील लोकांना पाण्याचा पुरवठा होत नाही. या संदर्भात सुद्धा चौकशी करून समितीला सविस्तर माहिती मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात गंगाखेड प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना क्रमांक ३, पडेगाव येथील योजना बंद आहे. उक्त आढाव्यामध्ये जांब, पडेगाव तसेच जवळगाव यांचा सुध्दा समावेश करून त्या गावांसह अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस होकारात्मक उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक ९३ वर जिंतूर तालुक्यातील प्रादेशिक नळ योजना २३ गावे पिंपळगाव काजळे येथील योजना पूर्ण असताना बंद आहे. सदर असून १६०.३० लक्ष रुपयांचे विद्युत बिल न भरल्यामुळे ती योजना बंद आहे. सदर योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झाली होती का, यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस माहिती विशद केली की, आम्ही या संदर्भात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडून माहिती घेऊन लेखी स्पष्टीकरणात सादर केली आहे. १६०.३० लक्ष रुपये जिल्हा परिषदेला देयक आलेले आहे.

समितीने विचारणा केली की, याचा अर्थ ही योजना महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने जिल्हा परिषदेकडे हस्तांतर केली आहे. आपल्याकडे ३१५ क्रमांकाचे लेखाशिर्ष आहे. त्या अंतर्गत जिल्हा परिषदेने १६०.३० लक्ष रुपयांच्या विद्युत देयकाची रक्कम का भरली नाही, पाणी पुरवठा योजनेचे वीज देयक थकीत असले तरी जोडणी तोडण्यात येऊ नये, असे मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिलेले आहेत. आपल्याला याबाबत माहिती आहे काय, यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस विशद केले की, तसे आदेश आहेत. परंतु, प्रत्यक्षात तसे घडत नाही.

समितीने यावर अशी विचारणा केली की, आपण विजेच्या देयकाचे १६० लक्ष रुपये का भरले नाहीत? यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस असे विशद केले की, परभणी जिल्ह्यातील ५ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झालेल्या आहेत.

समितीने त्याबाबत विचारणा केली की, अद्याप जिल्हा परिषदेने पिंपळगाव काजळे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना ताब्यात घेतलेली नाही, असे प्रथमदर्शनी वाटते. यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस विशद केले की, योजना हस्तांतरित झालेली नसेल तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नावे विजेचे देयक येत नाही.

समितीने आणखी विचारणा केली की, गंगाखेड प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झालेली आहे काय, ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झालेली आहे. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांना त्याची माहिती नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेली कोणतीही नळ पाणी पुरवठा योजना संयुक्त पहाणी व चाचणी घेतल्याशिवाय संबंधित यंत्रणा स्वतःकडे हस्तांतरित करून घेत नाही. अगोदर संयुक्त पहाणी होते, नंतर योजनेची चाचणी घेतली जाते, योजनेमध्ये काही दोष असतील तर ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देऊन त्याची पूर्तता करून घेतली जाते व त्यानंतर ती योजना हस्तांतर करून घेण्याबाबतचा विषय जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा समिती समोर येतो. समितीने मंजुरी दिल्यानंतर ती योजना हस्तांतरित करून घेण्याची कार्यवाही सुरू होते. आपण पिंपळगाव काजळे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या वीज बिलाचे १६० लक्ष रुपये थकीत असल्यामुळे योजना बंद असल्याचे नमूद केलेले आहे. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असेल आणि ती जिल्हा परिषदेने हस्तांतरित करून घेतली नसेल तर देयक अदा करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर कशी येईल, आपण समितीला चुकीची माहिती देत आहात. यावर कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. यांनी समितीस विशद केले की, प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचे विजेचे देयक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याच नावे असते.

समितीने निदेश दिले की, प्रादेशिक नळ पाणी पुरवठ्याचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. राज्यात वीज देयक भरणा न केल्यामुळे बऱ्याच योजना बंद आहेत, ही गोष्ट खरी आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ५६ योजनांची इंत्यभूत माहिती घ्यावी. समिती या विषयी पाणी पुरवठा

विभागाच्या सचिवांची साक्ष घेणार आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या योजनांची सविस्तर माहिती घेऊन ती समितीला सादर करावी. जर या योजनांच्या बाबतीत काही अनियमितता असेल तर संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला अवगत करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामीण पाणी पुरवठा :- जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या ५६ नळ पाणी पुरवठा योजनेसंबंधी गांवनिहाय आढावा योजना कार्यन्वीत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्यापही सादर करण्यात आला नाही. या प्रकरणी समितीने निदेश देऊनही अहवाल न पाठविण्याची कारणे काय आहेत व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

परभणी जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत माहे जून २०१८ अखेर एकूण (५२०) योजना हाती घेण्यात आल्या होत्या. सदरील अहवालात नमुद पाणी पुरवठा बंद असलेल्या ५६ योजनांपैकी सद्यःस्थितीत १३ नळ पाणी पुरवठा योजनांचा पाणी पुरवठा सुरू करण्यात आला असून एकंदर योजनांचा सद्यःस्थितीचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| (अ) एकूण योजना | ५२० |
| (ब) हस्तांतरीत व पाणीपुरवठा चालू असलेल्या योजना | ३२६ |
| (क) पाणीपुरवठा सुरू असलेल्या योजना | १५१ |
| (ड) पाणीपुरवठा बंद असलेल्या योजना | ४३ |

अशा प्रकारे अहवालात नमुद ५६ बंद नळ पाणी पुरवठा योजनांपैकी सद्यःस्थितीत १३ नळ पाणी पुरवठा योजनाचा पाणी पुरवठा सुरू करण्यात आला असून उर्वरित ४३ योजनांचा पाणी पुरवठा सुरू करण्यासाठी केलेली कार्यवाही या बाबतचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र उपलब्ध आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** प्रलंबित असलेल्या नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करून पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१८ अन्वये कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येत आहे. त्या शासन निर्णयाप्रमाणे गाव पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अधिकार कमी करण्यात आले असून जिल्हा परिषदेमार्फत कामे पूर्ण करून द्यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीने जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या ५६ नळ पाणी पुरवठा योजनेसंबधी विचारणा केली असता, यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस अशी माहिती विशद केली की, ज्यावेळी माननीय समितीने मागील वर्षी नोव्हेंबर, २०१७ या महिन्यात आढावा घेतला होता. त्यावेळी ५६ योजनांचे काम अपुर्ण होते. ते काम पूर्ण करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे की, भांडण व आपसात वाद असल्यामुळे व पैशांच्या अफरातफरीमुळे काही योजनांची कामे अपूर्णावस्थेत होती. याबाबत बैठकाही झालेल्या आहेत. आता ५६ पैकी १४ योजनांमध्ये पाणी सुरु केलेले आहे. २० योजनांचे बांधकामांचे काम बंद होते, त्याची आता सुरुवात झालेली आहे. जे राहिलेले आहेत, त्यापैकी ०२ कामांचे नवीन अंदाजपत्रक तयार केलेले आहे. जे शिल्लक काम होते, त्यांची अंदाजपत्रके येणे गरजेचे होते. पंधरा योजनांमध्ये आरआरसी केलेले आहे. पैशांची अफरातफर झाल्यामुळे जो पैसा अफरातफरीमध्ये अडकलेला होता, त्या अनुषंगाने संबंधित समितीचे सदस्य होते, त्यांच्या सात-बारावर आरआरसी करून बोजा टाकलेला आहे. तीन प्रकरणांमध्ये पोलीस केस केलेली आहे. दोन प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. ५६ पैकी १४ योजनांचे पाणी सुरु झाले. २० योजनांचे काम सुरु झालेले आहे. तसेच राज्याचाही आढावा घेतलेला आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अफरातफर झाली तर त्याची वसूली झाली पाहिजे, आरआरसी करून बोजा टाकून उपयोग नाही. शासनाच्या पैशांची वसूलीही झाली पाहिजे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, अनेक ठिकाणी वसूली झालेली आहे. स्थावर मालमत्तेवर बोजा टाकला की, ते काम करायला सुरुवात करतात. ज्यावेळी बोजा

टाकतो, त्यावेळी त्या समितीचे जबाबदार सदस्य होते, त्यांना हा आरआरसीचा बोजा चालू करतात. ते कामाला सुरुवात करतात. याचा प्रतिसाद चांगला आहे.

समितीने त्यावर विचारणा केली की, किती रुपयांची अफरातफर केली, किती कामांना याप्रमाणे सुरुवात केली, अफरातफर केली तर संबंधितांवर गुन्हे दाखल केले पाहिजे. गंभीर बाबींमध्ये अफरातफर केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले पाहिजेत. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, आरआरसीचा प्रतिसाद चांगला मिळालेला आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत, परंतु त्यापेक्षाही आरआरसी च्या माध्यमातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामुळे पाणीपुरवठा चालू होत आहे व त्या योजनेवर शासनाने अगोदर जेवढा पैसा गुंतविला, तो तरी कामात येतो आहे.

समितीने यानंतर विचारणा केली की, परभणी जिल्हयामध्ये समितीने दौरा केला असता पिण्याच्या पाण्याचा असंतोष जिल्हयात दिसत आहे. या अफरातफरीच्या प्रकरणामुळेही जिल्हयामध्ये असंतोष दिसत आहे. जिंतूरमधील योजना तात्पुरत्या स्वरुपात चालू करण्यात आली होती. नंतर ती बंद पडली होती. उर्वरित २० योजनांचे काम चालू झालेले आहे. ते पूर्ण होईल का, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, ०९ मार्चचा शासन निर्णय निघाल्यानंतर सर्व अभियंत्यांच्या बैठका घेतल्या, त्यांना समजावून सांगितले की कोणत्याही परिस्थितीत काम परत देऊन जिल्हा परिषदेने काम पूर्ण केले पाहिजे किंवा त्या समितीनेच काम पूर्ण केले पाहिजे. ते आधी तयार नव्हते, ते तयारही झालले आहेत. हा जो मुद्दा आहे तो पंचायती राज समितीच्या चर्चेत आला होता. औरंगाबादच्या बैठकीतही हा मुद्दा चर्चेला आला होता. त्या अनुषंगाने आता पुन्हा प्रत्येक जिल्हयाच्या दीड-दीड तासाच्या आढावा बैठका ठेवलेल्या आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात सगळया ३४ योजना हादगाव खूर्द, सेलू, भांगापूर, अहमदापूर, मानवत तालुका, नागरजवळा या तालुक्यात काही गोष्टी पूर्ण झाल्यानंतर या योजना चालू होतील.

वीज जोडणीचे कोटेशन महावितरण देत नाही कारण त्यांची थकबाकी बाकी आहे. ग्रामपंचायतीने त्यांच्याकडे असलेली थकबाकी दिलेली नाही. या योजनेचे जमा केलेले पैसे जिल्हापरिषदेने घेतले तर ते पैसे जिल्हापरिषदेला भरायला लागतील.

समितीने निदेश दिले की, परभणी जिल्ह्यातील दौऱ्यामध्ये समिती पाणीपुरवठ्याच्या नियोजनासंबंधात नाराज झालेली असून लोकांना स्वच्छ व शुध्द पाणी योजना मिळू शकत नाही. यासंदर्भात सचिव ,मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकाऱ्यांनी यामध्ये वारंवार आढावा घेऊन लक्ष घालावे. त्यांच्याकडून कामे लवकर करून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे व याबाबत प्रकर्षाने आढावा घेतला गेला पाहिजे. तसेच या योजना पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

## अभिप्राय व शिफारशी

परभणी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवालातील लेखी माहिती नुसार परभणी जिल्हयामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमानुसार ५२० योजनांच्या कामापैकी ३०० योजनांची कामे पूर्ण झाली असून, १६४ योजना पूर्ण करण्यात येत आहेत. सदर योजनांची कामे विहिरी, पाईपलाईन व पंपिंग मशिनरी अशा ३ टप्यामध्ये पूर्ण केल्यानंतर टप्पा एक मध्ये गावांना तात्पुरत्या स्वरूपात पाणी पुरवठा करण्यात येतो. साक्षी दरम्यान समितीला असे विदित करण्यात आले की, ५२० योजनांपैकी ४६४ गावांमध्ये तात्पुरता पाणी पुरवठा सुरू केलेला असून ५६ गावांमध्ये योजना बंद आहेत. तथापि, लेखी माहिती मध्ये ३०० योजना पूर्ण केल्याचे नमूद करण्यात आले आहे व १६४ योजना पूर्ण झालेल्या नाहीत व टप्पा एकची कामे केल्यानंतर तात्पुरता पाणी पुरवठा केल्याची माहिती संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे समितीला देण्यात आलेल्या माहिती मध्ये संदिग्धता दिसून येते याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. समितीच्या असेही निदर्शनास आले की, सेलू तालुक्यातील जवळगाव येथे रूपये एक कोटी खर्च करून पाण्याची टाकी बांधण्यात आली परंतु त्या गावामध्ये २ महिन्यांपासून पाणी पुरवठा सुरू नाही. त्याचप्रमाणे जांब या गावातील पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत गंगाखेड प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना क्रमांक ३ जिंतूर तालुक्यातील प्रादेशिक नळपाणी योजना २३ गावे पिंपळगाव काजळे येथील योजना पूर्ण असताना बंद आहे व पडेगांव येथील पाणी पुरवठा योजना बंद आहेत. यावरून असे दिसून येते की, **पाणी पुरवठा योजनांसंबंधी लेखी स्पष्टीकरणातील माहिती समितीला असत्य स्वरूपाची दिली आहे. सत्य माहिती ऐवजी असत्य स्वरूपाची माहिती देणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला असत्य स्वरूपाची माहिती दिल्यामुळे जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा व योजनानिहाय आढावा घेऊन समितीस इत्यंभूत माहिती दोन महिन्याच्या आत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## **जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)**

## **शाळा खोल्या व वस्तीशाळा बांधकामाच्या सद्य:स्थितीबाबत**

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्रात जिल्हा परिषदेचे सर्वात जास्त माध्यामिक विद्यालये (हायस्कूल) मराठवाडयात आहेत. परभणी जिल्हयात ४० माध्यामिक विद्यालये (हायस्कूल) आहेत. समितीने एरंडेश्वर येथील माध्यमिक शाळेला भेट दिली. तेथील निजामकालीन इमारत १९५० ची आहे. पेठशिवणी येथील इमारत देखील निजामकालीन आहे. तेथील ३-४ खोल्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर केला होता, याची निविदा झालेली होती. तसेच सर्व शिक्षा अभियानामध्ये आपणास रक्कम मिळाली नाही का, सर्व शिक्षा अभियानामध्ये खोलीकरिता निधी मिळतो. इमारतीकरिता निधी मिळत नाही. तेथील ग्रामस्थांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे, त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना पूर्ण इमारत पाहिजे आहे. केवळ दुरुस्ती किंवा खोल्या नको आहेत. समितीचे म्हणणे आहे की, या जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेचे ४० हायस्कूल आहेत, याचा एक बृहत आराखडा तयार करावा. याचे बांधकाम करण्याकरिता प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा की, निजामकालीन कोणती इमारत जास्त जीर्ण झालेली आहे. म्हणजे ती तातडीने बांधता येईल. म्हणजे कोणाच्याही जीविताला भविष्यात धोका होऊ नये. भविष्यात एखादया शालेय इमारतीचे छत कोसळले तर बऱ्याच अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे याचा बृहत आराखडा तात्काळ तयार करून शासनाकडे सादर करावा. शासन याकरिता निधी मंजूर करील. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस अशी माहिती दिली की, विभागीय आयुक्तांनी जिल्हापरिषदेकडून असा प्रस्ताव मागवून घेतलेला आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, यामध्ये केवळ माहिती दिलेली आहे, बृहत आराखडा तयार करून तो सादर करून तो मंजूरीकीता पाठपुरावा करण्यात यावा. विभागीय आयुक्तांकडुन तो शासनाकडे मंजूरीसाठी गेला पाहिजे. हा गंभीर (सेन्सेटीव) विषय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी होकरात्मक आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शाळा खोल्या व वसतीशाळा बांधकामाच्या सद्य:स्थितीबाबत :- जिल्हा परिषदेच्या ४० माध्यमिक विद्यालयाच्या बृहत आराखडा तयार करून त्यात निजामकालीन जिर्ण झालेल्या इमारती किती आहेत, तसेच सदरहू इमारतीच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव समितीने निदेश दिल्यानुसार विभागीय आयुक्ताकडून शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हयांतर्गत जिल्हा परिषदेचे एरंडेश्वर, पेठशिवणीसह ४० माध्यमिक शाळा आहेत. सदरचे शाळा इमारती निजामकालीन जिर्ण आहेत. मा. पंचायती राज समितीचे निर्देशानुसार प्रशालेचा बृहत आराखडा टाईप प्लान नकाशासह अंदाजपत्रक तयार करणे करीता कार्यकारी अभियंता यांना कळविले होते. त्यानुसार त्यांनी उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ ओरंगाबाद यांचे कडून प्राप्त प्रशालेचे इमारतीचा G + 2 या प्रमाणे प्रारूप नकाशा सादर केला असून ते मंजुर करून त्यांचेकडे परत केला आहे. त्यानुसार त्यांचे कडून format अंदाजपत्रक / इमारत प्रारूप आराखडा प्रत्यक्ष जागेनुसार देण्यात येणार आहे. त्यानुसार शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येईल. दरम्यान निजामकालीन प्रशालेचे इमारती करिता अंदाजे प्रतिप्रशाला रूपये ५.०० कोटी प्रमाणे रूपये २००.०० कोटी रकमेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

### **मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या अहवालाशी सहमत.

### **विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटी वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्याआधारे उपरोक्त अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या ४० माध्यमिक विद्यालयांचा बृहत आराखडा तयार करून त्यात निजामकालीन जीर्ण झालेल्या इमारतीची संख्या किती आहे. समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे सदर इमारतींच्या बांधकामांचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे पाठविला आहे का, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, या जिल्हयात निजामकालीन ४० जुन्या शाळा आहेत. त्या अतिशय जीर्ण अवस्थेत असल्यामुळे त्यांची मेजर दुरुस्ती करणे किंवा त्या नव्याने बांधण्याची गरज आहे. परंतु त्यासाठी प्रत्येक शाळेकरिता ५ कोटी रुपयांचे अंदाजे अंदाजपत्रक केलेले आहे. याबाबत स्ट्रक्चरल ऑडिट न झाल्यामुळे सविस्तर अंदाजपत्रक तयार केलेले नाही. स्ट्रक्चरल ऑडिट झाल्यानंतर सदर रक्कम कमी होईल. तरी देखील सदर रक्कम मोठी राहणार आहे. त्याबाबत वरिष्ठ स्तरावर बजेटची मागणी करणार आहोत. यासंदर्भात

पुढे समितीने अशी विचारणा केली की, सदर इमारती अतिशय जुन्या काळातील असल्यामुळे त्यांचे ताबडतोब स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, आमच्याकडे सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत अभियंते काम करीत आहेत. त्यांना आम्ही तेथे तपासणी करण्यासाठी पाठविण्याचे ठरवले आहे. यावर पुढे समितीने निदेश दिले की, सदर इमारती अतिशय जुन्या काळातील असून त्या जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे यासंबंधी तातडीने कार्यवाही करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, राज्यात जिल्हा परिषदेच्या सर्वात जास्त माध्यमिक शाळा (हायस्कुल) मराठवाड्यात आहेत. परभणी जिल्ह्यात ४० माध्यमिक शाळा (हायस्कुल) आहेत. समितीने भेट दिलेल्या एरंडेश्वर व पेठशिवणी येथील निजामकालीन माध्यमिक शाळांच्या इमारती सन १९५० मधील आहेत. सदर ठिकाणच्या ३-४ शाळा खोल्या दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्यात आला होता. त्यासाठी निविदा देखील काढण्यात आल्या होत्या. सर्वशिक्षा अभियानांतर्गत शाळा खोल्याकरीता निधी मिळतो. शाळा इमारती करीता निधी मिळत नाही. संपूर्ण शाळेच्या इमारतीसाठी निधी मिळावा केवळ दुरुस्त्या किंवा खोल्या नको म्हणून तेथील ग्रामस्थांनी मा. न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली आहे. **परभणी जिल्ह्यामधील निजामकालीन शाळांच्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत तसेच इतर शाळांसाठी देखील एक बृहत आराखडा तयार करण्याची नितांत आवश्यकता आहे. याकरीता शाळा व शाळा खोल्यांचे बांधकाम करण्याकरीता प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा. शाळेच्या इमारतीचे छत कोसळून कोणत्याही विद्यार्थ्यांच्या अथवा संबंधित कर्मचाऱ्यांच्या जीवितास भविष्यात निर्माण झालेला धोका विचारात घेता, शाळा व शाळा खोल्या बांधकामांचा तात्काळ बृहत आराखडा तयार करून विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे मंजुरीसाठी पाठवून द्यावा. सदर विषय अतिशय संवेदनशील असून विद्यार्थ्यांच्या जिविताशी व भवितव्याशी संबंधित असल्याने समिती अतिशय आग्रही असून शासनाने याबाबत गांभीर्याने कारवाई करून शाळांच्या इमारतीचे लवकरात लवकर संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करावे. तसेच प्रत्येक शाळा माध्यमिक (हायस्कुल)/ शाळा नव्याने बांधण्यासाठी रुपये ५ कोटी एवढे अंदाजपत्रक तयार केलेले असल्याची माहिती समितीला संबंधितांनी दिली आहे. त्यानुसार शाळा बांधकामासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## परभणी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी संदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांसोबत अनौपचारिक चर्चा करीत असताना जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी (वि.स.स) यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती दिली की, परभणी जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागाची परिस्थिती खूप गंभीर झालेली आहे. सध्या परभणी जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक विभागातील ६००- ७०० शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्याकरीता पुणे येथे जाऊन शिक्षक मिळण्याकरिता उपोषण केले. त्यावेळी सांगितले गेले की, एक महिन्याच्या आत शिक्षक देण्यात येतील. जिल्हा परिषदेतील शिक्षकांचे रोस्टर चार वर्षापूर्वीच मंजूर झाले पाहिजे होते. पण रोस्टर नुकतेच पाठविण्यात आले आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांपैकी ७ जिल्ह्यांचे रोस्टर ४ वर्षापूर्वी झाले आहे. परभणी जिल्हा परिषदेचे रोस्टर आता झाले आहे. जिंतूर मतदारसंघात शिक्षकांची ३५० पदे रिक्त आहेत.

मागील वर्षी येथे स्वच्छ भारत अभियानाचा विषय गाजला होता. परभणी जिल्हा परिषदेमध्ये मागील वर्षी श्री. खोडवेकर नावाचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. स्वच्छ भारत अभियान ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेमध्ये शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर १२ हजार रुपये दिले पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. त्यांनी त्यावेळी खाजगी कंत्राटदाराला टेंडरने याचे काम दिले. ५ हजार रुपयाचे मटेरीयल सप्लाय करण्याचे टेंडर देऊन टाकले. कंत्राटदाराने ५ हजार ऐवजी फक्त २ हजारचे मटेरीयल टाकले, बोगस काम केले. अशा घटना परभणी जिल्ह्यात झाल्या आहेत. ४-५ कोटींचे हे टेंडर आहे, हे ऑनलाईन केलेले नाही. जिल्हा परिषद स्तरावरून डायरेक्ट काम देऊन टाकले याची चौकशी झाली पाहिजे. याबाबतचा अहवाल समितीकडे मागविण्यात यावा. सध्या हा अहवाल आयुक्तांकडे आहे. लोकप्रतिनिधी (वि.स.स.) यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने निदेश दिले की, याबाबत चौकशी अहवाल समितीकडे मागविण्यात यावा.

तद्नंतर सभापती, बांधकाम व अर्थ समिती, जिल्हा परिषद, परभणी यांनी समितीला विशद केले की, प्रत्येक गावामध्ये बेसलाईन सर्व्हेमध्ये नावे कमी आहेत. उदा.माझ्या गावातील २०० पैकी १५० कुटुंबे बेसलाईन सर्व्हेमध्ये आली आहेत. बाकीची ५० कुटुंबे बेसलाईन सर्व्हेमध्ये नाहीत. त्यामुळे ते गाव १०० टक्के हागणदारीमुक्त होत नाही. त्याकरिता शासनाने एमआरईजीएसमधून १२ हजार रुपये देण्याची तरतूद केली. पण त्याची अंमलबजावणी होत नाही. जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत १०० टक्के काम होणार नाही. कुशल व अकुशल कामे १२ हजारामध्ये करता येतात. त्यामुळे बेसलाईन सर्व्हेमध्ये नावे नाहीत हा महत्त्वाचा विषय आहे. यावर समितीने निदेश दिले की, ग्रामीण भागासाठी हा महत्त्वाचा मुद्दा आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा हा विषय आहे. त्यामुळे या विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

तद्नंतर सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती यांनी समितीस विदित केले की, जिल्ह्यातील भारत निर्माणच्या कामामध्ये अध्यक्ष वेगळा व ग्रामपंचायतीमध्ये बॉडी वेगळी असते. त्यांच्या वादामध्ये काम पूर्ण होत नाही. अर्धवट कामे राहात आहेत. यावर समितीने निदेश दिले की, भारत निर्माणसह अनेक चांगल्या योजना आहेत, यामध्ये शासनाचा हेतू उदात्त व चांगला आहे. शासनाच्या कल्याणकारी योजनेद्वारे जनतेला सरकारच्या वतीने किमान पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे असा उद्देश आहे. गावातील लोकांच्या हातात योजना दिल्यास त्यांचे स्वतःचे काम आहे असे समजून ते व्यवस्थित करतील असा उद्देश होता. पण तसे झाले नाही. या योजनेमध्ये अग्रिम (ॲडव्हान्स) दिला गेला. त्यामध्ये चूक झाली. अग्रिम (ॲडव्हान्स) फस्त झाले, योजना झालीच नाही. या योजनेमुळे बाकीच्या योजना प्रलंबित आहेत. म्हणून या विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

यावर लोकप्रतिनिधी (वि.स.स.) यांनी समितीस विशद केले की, आता जे रोस्टर मान्य झालेले आहे, त्यामध्ये खुल्या संवर्गातील २५० शिक्षकांची गरज आहे. आता त्यांनी रोस्टर व्यवस्थित केले असते तर येथे अजून २५० शिक्षक मिळू शकतात. परंतु चुकीच्या पद्धतीने रोस्टर झालेले आहे. सध्याच्या रोस्टरमध्ये ७८ शिक्षक अतिरिक्त दाखविले आहेत. मागील महिन्यात बैठका झाल्या, शिक्षक संघटनांनी वाद केला. एवढे सर्व होऊन सुद्धा येथील शिक्षणाधिकारी यांच्या कामामध्ये कोणताही फरक नाही. यावर समितीस मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने मत व्यक्त केले की, शिक्षण विभागाच्या बाबतीत खूप अडचणी दिसत आहेत. रोस्टर व बॅकलॉगही दिसत आहे. पण अशा प्रकारचा बॅकलॉग आपल्या राज्यात इतरही जिल्ह्यामध्ये आहे.

यावर जिल्हा परिषद सदस्य यांनी समितीस विशद केले की, संच मान्यतेच्या खूप अडचणी आहेत. नस्ती लवकर निकाली निघाल्या पाहिजेत. यावर समितीने निदेश दिले की, शिक्षणाचा विषय महत्त्वाचा आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीनुसार परभणी जिल्ह्यातील शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे या विषयी सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

तद्नंतर जिल्हा परिषद, सदस्य यांनी समितीस विशद केले की, शिक्षण विभागासंबंधी सांगायचे झाल्यास श्रीमती गरुड, शिक्षणाधिकारी यांनी परभणी जिल्ह्यातील कोणत्याही शाळेला भेट दिलेली नाही. त्यांचा गट शिक्षण अधिकाऱ्यांवर कोणताही वचक नाही. जिल्हा परिषद सदनात आम्ही शिक्षणासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित केल्यानंतर आम्हाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, तुम्हाला कोणत्याही विभाग प्रमुखांविरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार नाही. आम्ही शिक्षणाधिकाऱ्यांकडे एखादे काम घेऊन गेल्यानंतर त्यांच्याकडून आम्हाला चांगल्या प्रकारे माहिती दिली जात नाही. शिक्षण विभाग महत्त्वाचा असताना अशाप्रकारे कार्यवाही होत असल्यामुळे यासंबंधी शिक्षणाधिकाऱ्यांची योग्य ती चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी.

यावर समितीने निदेश दिले की, यासंबंधी समितीला लेखी स्वरूपात सविस्तर माहिती द्यावी. जेणेकरून शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष होईल त्यावेळी यासंबंधी विचार केला जाईल असे आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) मराठवाड्यातील ०८ जिल्ह्यांपैकी ०७ जिल्हयांचे रोष्टर ०४ वर्षांपूर्वी पुर्ण झाले असून परभणी जिल्हयातील जिंतूर तालुक्यातील ३५० शिक्षकांच्या रिक्त पदांची भरती करण्यासाठी समितीने निदेश दिल्या प्रमाणे शासनस्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय?

(२) स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत ४ ते ५ कोटी रुपयांच्य निविदा ऑनलाईन न मागविता खाजगी कंत्राटदारास काम देण्यात आल्याने शौचालयाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्या प्रकरणी समितीने निदेश दिल्या प्रमाणे विभागीय आयुक्ताकडे अहवाल सादर केला आहे काय? उक्त अहवालात काय आढळून आले आहे, त्यात दोषी असणाऱ्या विरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय?

(३) प्रत्येक गावामध्ये बेसलाईन सर्व्हे करीत असतांना काही कुटुंबांचा समावेश या सर्व्हेमध्ये नसल्याने ते गाव १००% हागणदारीमुक्त झाले नाही. याकरीता एम.आर.ई.एस.मधून रुपये १२,००० देण्याची तरतूद असतांना तसेच कुशल अकुशल कामे १२,००० रुपयांमध्ये करता येतात. त्यामुळे या सर्व्हेमध्ये नावे नसलेल्या कुळाचा यामध्ये समावेश करण्याबाबत समितीने निदेश दिल्याप्रमाणे व अहवालात त्रुटी आढळून आल्या काय, असल्यास त्यानुसार संबंधिताविरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय?

(४) २५० शिक्षकांची गरज असतांना चुकीच्या पद्धतीने रोस्टर झाल्यामुळे ७८ शिक्षक अतिरिक्त दाखविण्यात आल्या प्रकरणी शिक्षणाधिकारी यांच्या विरूध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे? तसेच ७८ शाळांना ई-लर्निग करिता करारानुसार कंत्राटदाराने ०३ महिन्यांत ७० शाळांना साहित्य पुरवठा न केल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने समितीने निदेश दिल्याप्रमाणे कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय?

(५) श्री. भरत घनदाट, जिल्हा परिषद सदस्य परभणी यांनी वसतिगृहासाठी स्वतःच्या खर्चाने जागा विकत घेऊन निधी उपलब्ध करून दिल्यानंतर देखील वसतिगृह उभारण्याबाबत कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? समितीने निदेश दिल्याप्रमाणे याप्रकरणी जबाबदारी निश्चित करून संबंधिताविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) शिक्षण विभाग अंतर्गत जिंतूर तालूक्यात उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची २१ प्राथमिक पदवीधर शिक्षकांची १३० तर प्राथमिक शिक्षकांची ६७ पदे या प्रमाणे एकूण २१८ रिक्त पदे होती. शिक्षकांची पद भरती कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक) व परीक्षा परिषद, पुणे यांचेकडून केली जात असल्यामुळे जिंतूरसह जिल्ह्यातील सर्व शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

दरम्यान ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीने प्राथमिक शिक्षकांची पदे भरलेली आहेत. तसेच जिल्हा परिषद स्तरावर माहे मार्च, २०१८ मध्ये उच्चश्रेणी मुख्याध्यापक या संवर्गातील ७३ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत जिंतूर तालुक्यात उच्च श्रेणी मुख्याध्यापक, प्राथमिक पदवीधर व प्राथमिक शिक्षक मिळून एकूण रिक्त पदे १६५ आहेत. सदरची रिक्त पदे आगामी भरती प्रक्रियेत भरली जातील.

(२) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या पथकामार्फत चौकशी झालेली आहे. त्यामुळे अहवालासंबंधी या कार्यालयास माहिती उपलब्ध नाही.

(३) शासन पत्र क्र.स्वभामी-२०१८/प्र.क्र.५०२/पापु-१६ दि. २९.०८.२०१८ अन्वये दि. ०१.०९.२०१८ ते २९.०९.२०१८ पर्यंत वाढीव कुटुंबाची माहिती शासनास सादर करण्याबाबतचे नियोजन या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्याप्रमाणे सर्वेक्षण करून उर्वरित कुटुंबाची यादी शासनास सादर करण्यात येत आहे.

(४) परभणी जिल्हा परिषदेचे रोस्टर दि. १५.०७.२०१७ रोजी मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडून मंजूर करण्यात आले. मंजूर रोस्टर प्रमाणे ३२१ रिक्त पदे होती त्यात खुल्या प्रवर्गाची ६५ पदे अतिरिक्त होती. दरम्यानच्या कालावधीत रोस्टर प्रकरणी शासनस्तरावर प्राप्त तक्रारीनुसार विभागस्तरावरूनच सदर रोस्टरच्या चौकशीसाठी विभागस्तरावर उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात येऊन रोस्टरची चौकशी पूर्ण करण्यात आली. चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार नव्याने रोस्टर तयार करून मागासवर्ग कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे कार्यालयास मंजुरीसाठी सादर करण्यात आलेले आहे.

७८ शाळांना ई-लर्निग साहित्य व प्रणाली खरेदी या योजनेअंतर्गत सर्व साहित्य प्राप्त झाले आहे. तथापि, या योजने संदर्भातील प्राप्त तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली. चौकशी अहवाल काही शाळांना विलंबाने पुरवठा करणे, काही साहित्य कमी दर्जाचे असणे तसचे काही शाळांना साहित्य आस्थापित न करून देणे, ई. अनियमितता आढळून आल्या, पुरवठादारकडून कराराचा भंग झालेमुळे सदर साहित्य पुरवठादार यांना काळया यादीत समाविष्ठ करणे विषयी उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित पुरवठादारास देय असलेली उर्वरित १०% रक्कम रुपये ९,९६,०६० जप्त करण्यात आली आहे.

(५) शिक्षण विभागाअंतर्गत वसतीगृह बांधकाम केले जात नाही. तथापि वस्तीशाळा खोली बांधकाम केले जाते. सन २००९-१० मध्ये सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद परभणी मार्फत नवीन प्राथमिक शाळा मरडसगाव फाटा केंद्र मरडसगाव, ता.गंगाखेड येथे दोन खोली बांधकामासाठी रुपये ७.५० लक्षनिधी मंजूर होता त्यानुसार या कामास प्रशासकीय मान्यता देऊन निधी दि. २५.०८.२००९ रोजी धनाकर्षाद्वारे गटशिक्षणाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात आला.

परंतु सदर शाळा खोली बांधकामासाठी जागा उपलब्ध झाली नसल्यामुळे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे पत्र क्र.१५१९ दि. १२.०४.२०१३ अन्वये नवीन प्राथमिक शाळा मरडसगाव फाटा केंद्र मरडसगाव, ता. गंगाखेड येथील खोली बांधकाम रद्द करण्यात आले, तथापि केंद्र शासनाने मंजूर निधी समर्पित करून न घेता बांधकामे जागा उपलब्ध करून तात्काळ पूर्ण करून घेणेबाबत सुचित केले.

त्यानुसार संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने दि. ०४.०८.२०१७ रोजी जागा उपलब्ध केल्याबाबत करारनामा गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर केला त्यामध्ये शाळेसाठी जागा दानपत्राद्वारे विनामावेजा श्री. जव्हाद पिता मंजूरपाशा यांनी उपलब्ध करून दिले होती.

तेव्हा जागा उपलब्ध झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नवीन शाळा खोली बांधकाम मरडसगाव या कामास दि. १४.०९.२०१७ रोजी नवीन प्रशासकीय मान्यता दिली त्यानंतर गटस्तरावरील संबंधित शाळा खोली बांधकामाची तांत्रिक मान्यता रुपये ७,१२,५००/- पैकी ७५% निधी रुपये ५,३४,३७५/- अग्रीम स्वरूपात दि. ०१.११.२०१७ रोजी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस वर्ग करण्यात आला सदरचे बांधकाम सद्यास्थितीत शाळा खोलीचे प्लास्टर पूर्ण स्तरापर्यंत करण्यात आले आहे. सदरचे बांधकाम माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंत पूर्ण होईल.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१४) जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** अप्राप्त.

**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार परभणी जिल्ह्यात १,८६,१६८ कुटुंबांकडे शौचालय नव्हती. त्यापैकी १,७४,०९० इतक्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केले आहे. उर्वरित १२०७८ कुटुंबे सार्वजनिक/ सामूहिक शौचालयाचा वापर करीत आहेत. परभणी जिल्हा दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला आहे. पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या कुटुंबांची माहिती शासनास सादर करण्याबाबत शासन पत्र क्र.स्वभामि-२०१८/प्र.क्र.५०२/पापु-१६, दिनांक २९.०८.२०१८ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना निर्देश देण्यात आहेत. त्यानुसार कुटुंबाची यादी सादर करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे व ती सप्टेंबर २०१८ पर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे.

**(५) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय:-** (आस्था-१४) जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

**(६) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय:-** (आस्था-१४) जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, शिक्षण विभागांतर्गत जिंतूर तालुक्यात उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची २१, प्राथमिक पदवीधर शिक्षकांची १३० तर प्राथमिक शिक्षकांची ६७ अशी एकूण २१८ पदे रिक्त आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ज्यावेळी समितीने भेट दिली त्यावेळी २१८ पदे रिक्त होती. जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदली यामध्ये समानिकरणाचे प्रिंसिपल होते. त्या प्रमाणे बऱ्याच बदल्या झालेल्या आहेत. आता प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापकांची १६५ पदे रिक्त आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, पुढील भरती प्रक्रियेच्या वेळी ही पदे भरण्यात यावीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शासनाने खाजगी शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे जिल्हा परिषदेच्या शाळेत समायोजन करण्याबाबत कळविले आहे. यावर समितीने निदेश दिले की, आजूबाजूच्या जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक असतील तर त्या शिक्षकांचे जिल्ह्यात समायोजन करून घ्यावे. प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक आणि मुख्याध्यापकांची रिक्त पदे ताबडतोब भरण्यात यावीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होय असे होकारात्मक उत्तर दिले. तद्नंतर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विदित केली की, ग्रामविकास विभागाने भरतीबाबत संपूर्ण राज्यस्तरावरील माहिती एकत्रित करून वित्त विभागाकडे परवानगी मागितली आहे. वित्त विभागाकडून परवानगी मिळाल्यानंतर ते करता येईल. शिक्षकांची ८ हजार पदे आहेत. यावर समितीने निदेश दिले की, रिक्त पदे ताबडतोब भरून घेण्यात यावीत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, वस्ती शाळेच्या संदर्भातील विषय आहे. जागा उशिरा मिळालेली आहे. श्री. भरत घनदाट यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी जागा ताब्यात मिळाल्यानंतर ताबडतोब काम सुरू करण्यात आले. आता प्लॅस्टर पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. यावर समितीने निदेश केले की, सदर काम लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता परभणी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेवेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, परभणी जिल्हा परिषदेमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने शिक्षण विभागाची परिस्थिती खूप गंभीर झालेली आहे. सध्या परभणी जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक विभागातील ६०० ते ७०० शिक्षकांची पदे रिक्त आहेत. जिंतूर तालुक्यात मुख्याध्यापक व शिक्षकांची एकूण २१८ पदे भरती करण्यासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबतची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

**तसेच सन २०१६ मध्ये स्वच्छ भारत अभियान योजनेंतर्गत शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर १२ हजार रुपये संबंधित लाभार्थ्यांना देण्याचे शासनाचे धोरण आहे. शौचालय बांधकामासाठी रुपये ५ हजारांचे साहित्य पुरवठा करण्याचे काम एका खाजगी कंत्राटदाराला निविदेद्वारे देण्यात आले होते. तथापि, सदर कंत्राटदाराने रुपये ५ हजाराऐवजी रुपये २ हजार एवढ्या किमतीचा साहित्य पुरवठा करून निकृष्ट दर्जाचे काम केले. सदर निविदा रुपये ४ ते ५ कोटी एवढ्या किंमतीची असून या निविदेसाठी ऑनलाईन प्रक्रिया अवलंबिलेली नाही. याप्रकरणी विभागीय आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

**प्रत्येक गावामध्ये आधाररेखा सर्वेक्षण (बेसलाईन सर्व्हे) करीत असताना काही कुटुंबाचा समावेश या सर्वेक्षणामध्ये नसल्याने ते गाव १००% हागणदारीमुक्त झाले नाही. याकरीता एमआरईएस मधून १२०००/- रुपये देण्याची तरतूद असताना कुशल अकुशल कामे १२०००/- रुपयांमध्ये करता येतात. या सर्व्हेमध्ये नावे नसलेल्या कुळाचा समावेश करणेबाबत कार्यवाही करण्यात आली नाही. तरी सर्वेक्षण करून उर्वरित कुटुंबाची यादी शासनास सादर करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

२५० शिक्षकांची आवश्यकता असताना चुकीच्या पद्धतीने बिंदुनामावली (रोस्टर) झाल्यामुळे ७८ शिक्षक अतिरिक्त झाल्याप्रकरणी शिक्षणाधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीस सादर करावा तसेच **७८ शाळांना ई-लर्निंग करिता करारानुसार कंत्राटदाराने तीन महिन्यांत ७० शाळांना साहित्य पुरवठा न केल्याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराची देय असलेली रक्कम रुपये ९,९६,०६०/- जमा करण्यात आली असून या दंडात्मक रकमेसह पुरवठादाराने कराराचा भंग केल्याप्रकरणी उद्योग संचालनालयाने पुढे कोणती कारवाई केली याबाबत समितीकडे काहीच माहिती पाठविण्यात आली नाही, याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

श्री. भरत घनदाट, जिल्हा परिषद, सदस्य, परभणी यांनी वसतिगृह शाळा खोली बांधकामासाठी जागा विकत घेऊन निधी उपलब्ध करून दिल्यानंतर प्राथमिक शाळा मरडसगांव फाटा केंद्र मरडसगांव, ता. गंगाखेड येथील खोली बांधकाम पूर्ण करण्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली आहे. सदरचे बांधकाम माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असल्यास, त्याबाबतचा सद्य:स्थितीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## पंचायत समितीचे अंदाजपत्रकात समाजकल्याण व महिला व बालकल्याणासाठी विहित तरतूद न ठेवणेबाबत (पंचायत समिती, जिंतूर)

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ या वर्षी मागासवर्गीय लाभार्थींना वंचित ठेवण्याचे काम या पंचायत समितीने केले आहे. पंचायत समितीच्या अर्थसंकल्पात समाजकल्याण या बाबीसाठी २० टक्के, महिला व बालकल्याण या बाबीसाठी १० टक्के तरतूद करणे बंधनकारक आहे. ही तरतूद केल्याशिवाय त्या अर्थसंकल्पाला मंजुरी मिळत नाही. शासनाच्या या निर्णयाचे पंचायत समितीने उल्लंघन का केले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायत समितीने तरतूद केली आहे. परंतु, त्या वर्षी खर्च केलेला नाही. हा खर्च पुढील वर्षी देखील करता येतो. त्याप्रमाणे तो केला आहे का आणि केला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, याचा खुलासा गट विकास अधिकारी यांनी करावा.

यासंदर्भात समितीने असे निदेश दिले की, ज्या अर्थी, गट विकास अधिकारी हे खुलासा करीत नाहीत त्या अर्थी त्या वर्षी किंवा त्या पुढील वर्षी हा खर्च झालेला दिसून येत नाही. यामुळे मागासवर्गीय व महिला व बालकल्याणचे लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. ही एक प्रकारची अनियमितता आहे. अशा प्रकारे तरतूद करावी, हे जिल्हा परिषद अधिनियमात (ॲक्टमध्येच) नमूद केले आहे. परंतु, तरतूदच करायची नाही किंवा तरतूद केली असेल तर ती खर्च करायची नाही, ही गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, कारवाई करावी व समितीला पूर्तता अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस होकारात्मक उत्तर देऊन आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात समाज कल्याण या बाबीसाठी २०% महिला व बालकल्याण या बाबीसाठी १०% तरतूद न केल्यामुळे मागासवर्गीय लाभार्थी वंचित राहिल्या प्रकरणी समितीने निर्देश दिल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधिताविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये पंचायत समितीचे सुधारित अंदाज पत्रक रु. ३,०३,६२५/- एवढ्या रकमेचे तयार करण्यात आले. त्यानुसार समाज कल्याण विभागासाठी २० टक्के प्रमाणे रू. ६५,४५०/- व महिला व बालकल्याण विभागासाठी १० टक्के प्रमाणे अनुज्ञेय रक्कम रू. ३२,७२५/- एवढी ठेवण्यात आली आहे. तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. अकेले व श्री. कदम यांचे खुलासे घेण्यात आले. पंचायत समिती उपकराची रक्कम वर्ष अखेरीस म्हणजेच दि. १५ मार्च २०१३ रोजी प्राप्त झाल्याने खर्च करता आली नसल्याचा खुलासा श्री. अकेले यांनी केला आहे. तसेच संबंधित दुसरे गट विकास अधिकारी यांच्या खुलाशानुसार पंचायत समितीमध्ये २० गण असल्याने तुटपुंज्या रकमेचे नियोजन करता आले नाही. श्री. कदम यांचा खुलासा अंशतः मान्य केला आहे.

पुढील वर्षामध्ये समाज कल्याण व महिला व बालकल्याण अंतर्गत खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे:—

| वर्ष | समाज कल्याण खर्च | महिला व बालकल्याण खर्च |
|---|---|---|
| २०१४-१५ | १६,४०,५९० | ६,९०,००० |
| २०१५-१६ | १२,६९,३६० | ६,३४,६८० |
| २०१६-१७ | १४,१२,७७५ | ७,०५,६४० |
| २०१७-१८ | ३,६६,०२९ | १,६९,१२९ |

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) याप्रकरणी जि.प. परभणी कडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने तत्कालीन गट विकास अधिकारी श्री. एम.पी. कदम यांचेविरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने सादर करण्याविषयी मु.का.अ. जि.प., परभणी यांना सूचित करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने परभणी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर २०१८ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीस जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित गट विकास अधिकारी, श्री. कदम यांची विभागीय चौकशी चालू आहे व त्या चौकशीच्या पुरवणी दोषारोपामध्ये हा मुद्दा समाविष्ट करण्यात आलेला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ मध्ये जिंतुर पंचायत समितीला वाढीव उपकरापोटी रुपये ४,३१,४९८/- एवढी रक्कम प्राप्त झालेली होती. यामधून शाळा इमारत दुरुस्ती, जुन्या विहिरींची दुरुस्ती, विरंजक चूर्ण यावर खर्च करण्यात आला आहे. सन २०१३-२०१४ यावर्षी वाढीव उपकरापोटी अधिकची रक्कम प्राप्त झाली होती. जिल्हा परिषदेला मिळालेल्या थकित रकमेमधून त्या त्या पंचायत समित्यांना वाढीव उपकरच्या थकीत रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. पंचायत समितीच्या अर्थसंकल्पामध्ये समाजकल्याण या विभागासाठी २० टक्के, महिला व बालकल्याण या विभागासाठी १० टक्के तरतूद करणे बंधनकारक आहे. ही तरतुद केल्याशिवाय त्या अर्थसंकल्पाला मंजुरी मिळत नाही. शासनाच्या सदर मार्गदर्शक सुचनानुसार जिंतूर पंचायत समितीने उल्लंघन केले आहे. परिणामी मागासवर्गीय तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचे लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेले आहेत ही एक प्रकारची अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये पंचायत समितीचे सुधारित अंदाजपत्रक रुपये ३,०३,६२५/- एवढ्या रकमेचे तयार करण्यात आले. त्यानुसार समाजकल्याण विभागासाठी २० टक्के प्रमाणे रुपये ६५,४५०/- व महिला व बालकल्याण विभागासाठी १० टक्के प्रमाणे अनुज्ञेय रक्कम रुपये ३२,७२५/- एवढी आहे. **प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन गटविकास अधिकारी, श्री. एम. पी. कदम यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने सादर करण्याविषयी ग्रामविकास विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना सूचित केलेले आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, परभणी (प्रशासन)

## जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत परभणी जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने संबंधित अधिकाऱ्यांना निदेशित केले की, जिल्हा परिषदांच्या जागा आयडेंटीफाय करून तेथे जिल्हा परिषदांची मालकी असल्याबाबत फलक (बोर्ड) लावून उत्पन्न वाढविता येऊ शकते. परंतु असे घडलेले नाही. या संदर्भात तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर जागा आयडेंटीफाय करून त्यांना संरक्षक भिंत (वॉल कंपाऊंड) करणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात अतिक्रमण होऊ नये याकरिता डीपीडीसीमध्ये हेड आहे. त्या करोडो रुपयांच्या जागा आहेत. सन २०१२-१३ मध्ये यासंबंधी शासन निर्णय आला होता.

जिल्हा परिषदांकडे असलेल्या अनेक जागा शासनाच्या मालकीच्या आहेत. परंतु त्या जागा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झालेल्या नाहीत. शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे शासन निर्णय काढला असून त्याच्या प्रती सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या आहेत. जिल्हा परिषदेकडे ज्या जागांचा ताबा असेल त्याच्या ७/१२ च्या उताऱ्यावर जिल्हा परिषदेच्या नावाने नोंद करून घ्यावी. या संदर्भात बैठक घेऊन कार्यवाही करणे गरजेचे आहे असे समितीने सूचित करून निदेश दिले की, मागील काळात अनेक लोकांनी सार्वजनिक हिताकरिता दवाखाने, शाळांकरिता जागा दान स्वरुपात दिलेल्या आहेत. परंतु आता त्या जागेच्या किंमती वाढल्या आहेत. तसेच त्या लोकांची मुले सुद्धा त्या जागा परत मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. अशा परिस्थितीत सर्व जिल्हयाचा आढावा घ्यावा. तसेच यासंबंधी महसूल व ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) जिल्हा परिषदेच्या मालकीच्या अनेक जागा अद्याप जिल्हा परिषदेच्या नावावर नसल्याने सदर जागांचा शोध घेऊन त्या जागांवर संरक्षित भिंत बांधून ७/१२ च्या उताऱ्यावर जिल्हा परिषदेच्या नावाची नोंद करण्यासंदर्भात समितीने निदेश दिल्याप्रमाणे जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

(२) समितीने निर्देश दिल्यानुसार जिल्हा परिषदेंतर्गत असणाऱ्या शाळा व दवाखाने या करीता खाजगी व्यक्तीकडून दान स्वरूपात दिलेल्या जागा खाजगी व्यक्तीने पुन्हा मिळविण्यासाठी किती अर्ज प्राप्त झालेले आहेत, या बाबत आढावा घेण्यात आलेला आहे काय, असल्यास जिल्हा परिषदेने पुढे कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत सर्व विभाग प्रमुख यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जागांचे ७/१२ चे अभिलेखे हस्तगत करून घेणे बाबत वेळोवेळी लेखी कळविण्यात आलेले आहे.

तसेच जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेली परंतु मालकी अधिकारात सरकारी असा उल्लेख असणारी निवासस्थानाची जागा गट नं.३९७, ३९८, ३९९ व ४०५ जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे पाठपुरावा करून मालकी अधिकारामध्ये जिल्हा परिषद नावाने लावण्यात आली आहे.

मौ.सोनपेठ येथील गट क्र.२२४ ही जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या नावाने ७/१२ वर लावण्यात आलेली आहे. नविन प्रशासकीय इमारतीची जागा कार्यकारी अभियंता (बां) या नावाने पिआर कार्ड करून घेण्यात आले आहे.

इतर जागा नावावर करून घेणे बाबत जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख व महसूल विभागाशी संपर्क करून कार्यवाही सुरू आहे.

(१) विभागाकडील एकूण जागांची संख्या - १९.

(२) सन २०१६ पर्यंत ७/१२ किंवा पिआर कार्ड वर लावण्यात आलेल्या जागांची संख्या - ९.

(३) सन २०१६-१८ या कालावधीत ७/१२ किंवा पिआर कार्ड वर लावण्यात आलेल्या जागांची संख्या-६.

(४) मालकी हक्काबाबत न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या-४.

(२) परभणी जिल्हा परिषद अंतर्गत प्रा.शा.डिग्रस ता.परभणी या शाळेकरीता दानपत्राव्दारे श्री. आसाराम बोंबाले यांनी शाळा बांधकामासाठी १० गुंठे जागा दि. ०१ जुलै १९९९ रोजी दिली होती. परंतु आसाराम बोंबाले हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांनी सदर जागा परत मिळणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचेकडे अर्ज सादर केला होता त्यानंतर त्यांनी मा. २ रे सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, परभणी येथे जागा परत मिळणेसाठी दावा दाखल केला.

मा. दिवाणी न्यायालयाने दावा मंजूर करून दि. ११ सप्टेंबर २०१४ रोजी संबंधितास जागा परत करण्याची व जिल्हा परिषद कार्यालयास वसुलीची नोटीस दिली त्यावर शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी दि. ०८ एप्रिल २०१५ रोजी मा. दिवाणी न्यायालय यांचेकडे व त्यानंतर दि. ०५.१२.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे अपिल करण्यात आले. त्यावर मा. उच्च न्यायालयाने त्याच दिवशी स्थगिती दिली त्यानंतर मा. उच्च न्यायालयाने दि. ०६ जून २०१६ रोजी जिल्हा परिषदेस सदर जागेबाबत मुळ पुरावा मा. जिल्हा न्यायालयास सादर करण्यात यावा असे आदेशीत केले.

या प्रकरणात तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचे मूळ कागदपत्रे पंचायत समिती, परभणी येथे सादर केली असल्याबाबत कळविले होते. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी दि. २२ सप्टेंबर २०१६ रोजी संबंधित ग्रामसेवकास पत्र देऊन मूळ कागदपत्रे सादर करण्याबाबत आदेशित केले व त्यानुसार ग्रामसेवक डिग्रस यांनी संबंधित जागेचे दानपत्र व ७/१२ चा उतारा पदभारामध्ये मिळाला नसल्याचे दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी कळविले.

तत्पुर्वी उप मुख्य कार्यकारी (सा) यांनीही दि. १० नोव्हेंबर २०१५ रोजी सन १९९६ ते २०११ पर्यंत या प्रकरणाशी संबंधित असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन सर्वांना मूळ कागदपत्रे उपलब्ध करून देणेबाबत आदेशित केले परंतु, मूळ कागदपत्र व ७/१२ चा उतारा उपलब्ध झाला नाही. दरम्यान दि. ०२ जानेवारी २०१७ रोजी मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश यांचे कोर्टात जिल्हा परिषदेने केलेले अपील फेटाळण्यात आले व मा. २ रे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे दि. ११ सप्टेंबर २०१४ चे आदेश कायम ठेवण्याचा हुकुम दिला. सदर निर्णयाविरूद्ध जिल्हा परिषदे मार्फत मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे अपील दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-११) जिल्हा परिषद, परभणी यांच्या अभिप्रायाशी सहमत.

**अभिप्राय व शिफारशी**

परभणी जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदांच्या जागांचे मूल्य बाजारभावानुसार करोडो रुपयांचे आहे. त्यामुळे सदर जागा अभिज्ञात करून तेथे जिल्हा परिषदेची मालकी असल्याबाबत नामफलक लावण्यात यावा. यासंदर्भात तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर जागा अभिज्ञात करून अतिक्रमण होऊ नये म्हणून त्या जागे भोवती संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हा नियोजन विकास समितीमध्ये लेखाशीर्ष आहे.

**राज्यात जिल्हा परिषदांच्या मालकीच्या असलेल्या अनेक जागा अद्याप जिल्हा परिषदांच्या नावावर नसल्याने सदर जागांचा शोध घेऊन त्या जागांवर संरक्षक भिंत बांधून ७/१२ च्या उताऱ्यावर जिल्हा परिषदेच्या नावाची नोंद करण्यासंदर्भात ग्रामविकास विभागाने सर्व संबांधित जिल्हापरिषदांना तशा मार्गदर्शक सुचना शासन निर्णयाव्दारे द्याव्यात कारण गत काळात अनेक दानशूर व्यक्तींनी शाळांसाठी जमिनी वा जागा दान दिलेल्या असून आता त्या जागांचे बाजारमूल्य अनेक पटींनी वाढलेले आहे. तसेच जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत सर्व विभाग प्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जागांचे ७/१२ चे अभिलेखे हस्तगत करून घेणेबाबत कळविल्यानुसार किती जागा जिल्हा परिषदेने अभिज्ञात (आयडेंटीफाय) केलेल्या आहेत. व मालकी हक्काबाबत न्यायप्रविष्ट प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केलेली आहे, याबाबतची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, परभणी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१४) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :**

श्री. विजय भांबळे, वि.स.स. (जिंतूर)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(३) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्रीमती उज्वला राठोड, अध्यक्षा, जि.प.परभणी
(२) श्रीमती भावना नखाते, उपाध्यक्ष, जि.प. परभणी
(३) श्री. श्रीनिवास मुंढे, सभापती, जि.प. परभणी
(४) श्रीमती उर्मिला बनसोडे, सभापती, समाजकल्याण, जि.प. परभणी
(५) श्रीमती राधा सुर्यवंशी, सभापती, महिला व बालकल्याण, जि.प.परभणी
(६) श्रीमती वंदना देशमुख, सदस्य, जि.प. परभणी

(७) श्री. भरत घनदाट, सदस्य, जि.प.परभणी

(८) श्रीमती सावित्रीबाई सोळनर, सभापती, पालम पंचायत समिती

(९) श्रीमती मंदाताई यादव, सभापती, सोनपेठ पंचायत समिती

(१०) श्री. बाळासाहेब घुगे, सदस्य, जि.प.परभणी

(११) श्री. गणेश रोकडे, सदस्य, जि.प.परभणी

(१२) श्री. विष्णु नामदेवराव मांडे, सदस्य, जि.प.परभणी

(१३) श्री. अजय चौधरी, गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, जि.प.परभणी

(१४) डॉ. सुभाष कदत, गटनेता, भाजपा, जि.प.परभणी

(१५) श्री. रामराव उबाळे, सदस्य, जि.प.परभणी

(१६) श्री. अशोक काकडे.

**जिल्हा परिषद, परभणी :**

(१) श्री. प्रताप सवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. एम.व्ही.करडखेलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(३) श्री. साहेबराव देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(४) श्री. व्ही.एस.मुळीक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग

(५) श्री. सी.एम.ढोकणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(६) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्रीमती आशा गरुड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्रीमती एस. के. भोजने, समाजकल्याण अधिकारी

(९) श्री. बी.एस.कच्छवे, कृषी विकास अधिकारी

(१०) श्री. बी.आर.कुंडगीर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. एच.डी.वसुकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१२) श्री. विलास गवादे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. डी.टी.वाघमारे, डी.ए.एच.ओ.

(१४) श्री. आर.डी.खंदारे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१५) श्री. अडबडवार, उप अभियंता (यांत्रिक)

(१६) श्री. एम.व्ही.कुरडकेरकर, गटविकास अधिकारी, परभणी

(१७) श्री. अंकुश चव्हाण, गटविकास अधिकारी, जिंतूर

(१८) श्री. टी.बी.शिंदे, गटविकास अधिकारी, गंगाखेड

(१९) श्री. मो.या.अभंगे, गटविकास अधिकारी, सोनपेठ

(२०) श्री. एम.बी.कोळी, गटविकास अधिकारी, पालम

(२१) श्री. विठ्ठल सुरोशे, गटविकास अधिकारी, पूर्णा

(२२) श्री. एस.आर.कांबळे, गटविकास अधिकारी, सेलू.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परभणी जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, परभणी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१४) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी.

**जिल्हा परिषद, परभणी :**

(१) श्री. प्रताप सवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्री. साहेबराव देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(४) श्री. व्ही.एस.मुळीक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग

(५) श्री. बी.आर.कुंडगीर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(६) श्री. एम.व्ही.कुरडकेरकर, गटविकास अधिकारी, परभणी

(७) श्री. अंकुश चव्हाण, गटविकास अधिकारी, जिंतूर

(८) श्री. टी.बी.शिंदे, गटविकास अधिकारी, गंगाखेड

(९) श्री. मो.या.अभंगे, गटविकास अधिकारी, सोनपेठ

(१०) श्री. एम.बी.कोळी, गटविकास अधिकारी, पालम

(११) श्री. विठ्ठल सुरोशे, गटविकास अधिकारी, पूर्णा

(१२) श्री. एस.आर.कांबळे, गटविकास अधिकारी, सेलू.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात परभणी जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०१७**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, परभणी**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(९) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(११) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(३) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**जिल्हा परिषद, परभणी :**

(१) श्री. प्रताप सवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एम.व्ही.करडखेलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
(३) श्री. साहेबराव देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग
(४) श्री. व्ही.एस.मुळीक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग
(५) श्री. सी.एम.ढोकणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(६) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(७) श्रीमती आशा गरुड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) श्रीमती एस के भोजने, समाजकल्याण अधिकारी
(९) श्री. बी.एस.कच्छवे, कृषी विकास अधिकारी

(१०) श्री. बी.आर.कुंडगीर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. एच.डी.वसुकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)

(१२) श्री. विलास गवादे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. डी.टी.वाघमारे, डी.ए.एच.ओ.

(१४) श्री. आर.डी.खंदारे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१५) श्री. अडबडवार, उप अभियंता (यांत्रिक)

(१६) श्री. एम.व्ही.कुरडकेरकर, गटविकास अधिकारी, परभणी

(१७) श्री. अंकुश चव्हाण, गटविकास अधिकारी, जिंतूर

(१८) श्री. टी.बी.शिंदे, गटविकास अधिकारी, गंगाखेड

(१९) श्री. मो.या.अभंगे, गटविकास अधिकारी, सोनपेठ

(२०) श्री. एम.बी.कोळी, गटविकास अधिकारी, पालम

(२१) श्री. विठ्ठल सुरोशे, गटविकास अधिकारी, पूर्णा

(२२) श्री. एस.आर.कांबळे, गटविकास अधिकारी, सेलू

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील परभणी जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक,

**मंत्रालयीन विभागीय सचिव :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग)

(५) श्री. एकनाथ डवले, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग

(६) श्रीमती इंद्रा मालो, आयुक्त, आयसीडीएस, महिला बालकल्याण विभाग

(७) श्री. ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(८) श्री. र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(९) श्री. म.सा.ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(१०) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(११) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. बाळासाहेब रासकर, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग

(१३) डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग

(१४) श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग

(१५) श्री. सु.ल.टोपले, उप सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(१६) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१७) श्री. चंद्रकांत मोटे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१८) डॉ. विजय भुंदेवाड, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

**जिल्हा परिषद, परभणी :**

(१) श्री. बी.पी. पृथ्वीराज, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. विजय मुळीक,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. प्रताप सवडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्रीमती मंजुषा जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. कैलास घोडके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(७) श्री. एम.व्ही.करडखेलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(८) श्री. नईमोद्दिन अलीमोद्दिन, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, आयुक्त, आयसीडीएस, महिला बालकल्याण विभाग, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(३) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) श्रीमती शुभांगी शेठ, सह सचिव, वित्त विभाग

(५) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

**जिल्हा परिषद, परभणी :**

(१) श्री. बी.पी.पृथ्वीराज, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. विजय मुळीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. प्रताप सवडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्रीमती मंजुषा जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्रीमती ए.बी.गरुड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. पी.एम.परभणीकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(८) श्री. एम.व्ही.करडखेलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(९) श्रीमती एस.के.भोजने, समाजकल्याण अधिकारी

(१०) श्री. एस.एम.कादरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी

(११) श्री. एस.एम.कादरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी

(१२) श्री. डी.बी.घुगे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानवत

(१३) श्री. पी.एस.भोसले, सहाय्यक लेखा अधिकारी, पंचायत समिती, परभणी

(१४) डॉ. एस.पी.हसमुख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात परभणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, वित्त विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.
(११) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१२) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(१३) प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत बाबीसाव्या व तेविसाव्या अहवालांच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई